रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १५७
www.ramprahar.com
◆ बुधवार, २४ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'त्या' आवाजाबाबत सोल्वे कंपनीकडून लपवाछपवी?/२
बल्करच्या धडकेत पती-पत्नीचा मृत्यू/३
आजपासून विजय हजारे ट्रॉफीचा थरार/८

## दहावी-बारावी परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही अनिवार्य



**कोल्हापूर :** फेब्रुवारी आणि मार्च २०२६मध्ये होणाऱ्या दहावी व बारावी परीक्षा आता पूर्णपणे सीसीटीव्हीच्या देखरेखीखालीच आयोजित होणार आहेत. परीक्षा केंद्रांवर १००% सीसीटीव्ही सुविधा अनिवार्य करण्यात येणार असल्याचे कोल्हापूर विभागीय बोर्डाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२३) सांगितले. जर कोणत्याही परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही सुविधेचा अभाव आढळला तर त्या शाळेची मान्यता रद्द होण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. अतिग्रे येथील संजय घोडावत जुनिअर कॉलेजमध्ये आयोजित बोर्ड परीक्षा पूर्वतयारी मुख्याध्यापक सहविचार सभेत ते बोलत होते. शिक्षकांनी भयमुक्त आणि कॉपीमुक्त परीक्षा वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तर लेखनाचा नियमित सराव करून द्यावा. पालकांना परीक्षेबद्दल योग्य माहिती द्यावी, असे त्यांनी सांगितले.

# मनपा निवडणुकीसाठी वाटाघाटींना वेग

## बैठकांचे सत्र, जागावाटप अंतिम टप्प्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांच्या बैठकांचे सत्र सुरू आहे. विशेषतः मुंबई, पुणेसारख्या मोठ्या व महत्त्वाच्या महापालिका जिंकण्यासाठी युती, आघाडीच्या वाटाघाटींना वेग आला आला असल्याचे चित्र आहे.

देशाची आर्थिक आणि राज्याची मुख्य राजधानी असलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. या निवडणुकीसाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या बंधूंची युती झाली असून बुधवारी (दि. २४) ते याबाबत घोषणा करणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, मनसेला सोबत घेतल्याने महाविकास आघाडीतील एक प्रमुख घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे.



मुंबई महापालिकेसाठी महायुतीमधील भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील जागावाटपाची चर्चाही आता अंतिम टप्प्यात पोहचली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन्ही पक्षांमध्ये आतापर्यंत बहुसंख्य जागांवर एकमत झाले असून पुढील बैठकीत उर्वरित जागांबद्दल निर्णय घेतला जाणार आहे. या चर्चेत जागांसंदर्भातील मुद्दा मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

राज्यातील मुंबईसह मुदत संपलेल्या २७ तसेच नव्याने स्थापन झालेल्या जालना आणि इचलकरंजी महानगरपालिका निवडणुकीसाठी मंगळवारपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या तरी जागावाटप अंतिम करण्यावर सर्व पक्षांकडून भर दिला जात आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लवकरच जागावाटप निश्चित करून अर्ज भरण्यास सुरुवात होईल.

## मान्यवरांच्या उपस्थितीत रामबागचा वर्धापन दिन उत्साहात

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवानिमित्त हृद्य सत्कार



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि निसर्गप्रेमींच्या गळ्यातील ताईत असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील रामबाग या अतिसुंदर उद्यानाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा हजारो नागरिकांच्या साक्षीने मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात सोमवारी (दि. २२) सायंकाळी साजरा झाला.

या सोहळ्याला खासदार धैर्यशील पाटील, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, 'दिबा'साहेबांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर व्यासपीठावर उपस्थित होते.



(अधिक छायाचित्रे पान ८वर..)

रामबाग आता पर्यटनस्थळ म्हणून उदयास आले आहे. थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि समाजाचे आधारस्तंभ असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, म्हसेश्वर मंदिर समिती आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीच्या वतीने त्यांचा या वेळी हृद्य सत्कार करून आदर व्यक्त करण्यात आला. **(पान २ वर..)**

*समाजामध्ये अनेक माणसे असतात. कुणी राजकारणात यशस्वी असतो, पण सामाजिक कार्यात नसतो. एखादा व्यवसायात यशस्वी असतो, पण समाजकार्यात नसतो. एखादा समाजकार्यात यशस्वी असतो, पण संस्थात्मक राजकारणात कुठेच नसतो आणि एखादा व्यक्ती या सगळ्यात असतो, पण नाती-गोती आणि माणसे सांभाळण्यात कमी असतो, परंतु सर्व क्षेत्रात यशस्वी आणि सर्व बाबींना स्पर्श केलेले एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत.*

**-धैर्यशील पाटील**, खासदार

*रामबाग शब्दाने या परिसराला दिशा देणारा मार्ग दाखवला आहे आणि या रामबागेमुळे ग्रामीण भागात चैतन्य निर्माण केले आहे, ते लोकनेते रामशेठ ठाकूर या दानशूर व्यक्तीमत्वाने. स्वतःच्या पैशाचा उपयोग ते जनतेच्या हितासाठी करतात. रामबाग केवळ या परिसराच्या नव्हे; तर जिल्ह्याच्या अग्रस्थानी आहे. येथील परिसराच्या विकासाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी योगदान दिले असून या उद्यानाने आकर्षणाची सर्वांवर भुरळ घातली आहे. त्यामुळे दरवर्षी मी या ठिकाणी येतो.*

**-रविशेठ पाटील**, आमदार

## मनसे नेते गौरांग जेठवा कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माथाडी कामगार सेनेचे जिल्हा अध्यक्ष गौरांग जेठवा यांच्यासह पनवेल शहरातील अनेक कार्यकर्ते व सहकाऱ्यांनी सोमवारी (दि. २२) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमास भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, महाराष्ट्र वाहतूक सेनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, भाजप पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, तसेच पवन सोनी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मनसेचे नेते गौरांग जेठवा यांच्यासोबत राजेश चौधरी, मानव पुंजारा, सुदेश घरत, प्रणित म्हात्रे, संतोष गोळे, शुभम नांद्रेकर, साईराज बताळे, भार्गव ठाकूर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. जेठवा यांनी भाजपच्या नेतृत्वावर आणि पक्षाच्या विकासाभिमुख धोरणावर विश्वास व्यक्त करत सामान्य कामगार, युवक आणि स्थानिक प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे काम करता यावे म्हणून भाजपमध्ये प्रवेश केल्याचे सांगितले.

## निवडक

### ओडिशामध्ये २२ नक्षलींची पोलिसांसमोर शरणागती


**मलकानगिरी :** ओडिशाच्या मलकानगिरी जिल्ह्यात २२ नक्षलवादी मंगळवारी (दि. २३) पोलिसांसमोर शरण आले. यामध्ये एक विभागीय प्रमुख, सहा एसीएम आणि १५ पार्टी सदस्य आहेत. या नक्षलवाद्यांवर साडेपाच लाख रुपयांपासून २७.५० लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे होती. एकाच वेळी २२ प्रमुख नक्षलवादी शरण आल्यामुळे ओडिशातील नक्षलवाद्यांच्या कारवाया थंडावण्याची शक्यता आहे.

### भारतासोबत संबंध सुधारा! रशियाची बांगलादेशला तंबी

**मॉस्को :** बांगलादेशात सध्या परिस्थिती खूपच अस्थिर झाली आहे. राजधानी ढाकामध्ये रोज आंदोलने अन् हिंसाचार होत आहेत. विद्यार्थी नेता हादीच्या हत्येनंतर तेथील भारतविरोधी अन् कट्टर इस्लामिक आंदोलनकर्त्यांनी हिंसक आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर बांगलादेशमधील रशियाचे राजदूत अलेक्झांडर जी खोजीन यांनी, बांगलादेशला जेवढ्या लवकर भारताशी संबंध सुधारता येईल तेवढे चांगले आहे, असे सुनावलेय.

## सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिकसह सर्व आरोपींवर आरोप निश्चित

**बीड : प्रतिनिधी**



संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंगळवारी (दि. २२) बीड येथील मकोका न्यायालयात हायव्होल्टेज सुनावणी झाली. या सुनावणीत न्यायालयाने वाल्मिक कराडसह सर्व आरोपींवर अधिकृतपणे आरोप निश्चित केले आहेत. या वेळी मुख्य आरोपी कराड याने पहिल्यांदाच मौन सोडून न्यायालयासमोर आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला, मात्र न्यायालयाने पुढील कारवाई सुरू ठेवली.

न्यायाधीशांनी १८०० पानांच्या दोषारोपपत्रातील संपूर्ण घटनाक्रम आरोपींना वाचून दाखवला. तुम्हाला हे आरोप मान्य आहेत का? असा थेट प्रश्न जेव्हा विचारला गेला, तेव्हा वाल्मिक कराडसह सर्व सहा आरोपींनी मान्य नाहीत असे उत्तर दिले. या वेळी कराड स्वतःहून म्हणाला, मला काही बोलायचे आहे, मात्र कायद्याच्या प्रक्रियेनुसार आता प्रत्यक्ष साक्षीदार आणि पुराव्यांचे काम सुरू होणार आहे.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी न्यायालयात पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, आबाडा कंपनीकडून मिळणाऱ्या खंडणीच्या व्यवहारात संतोष देशमुख हे अडथळा ठरत होते. याच रागातून आरोपींनी त्यांना टाकळी शिवारात नेऊन अमानुष मारहाण केली. आरोपींनी केवळ हत्या केली नाही, तर त्याचे १५ व्हिडीओ आणि आठ फोटो काढून त्या क्रूरतेचा आनंद साजरा केला. हे व्हिडीओ आता आरोपींच्या वकिलांना देण्यात आले असून हेच व्हिडीओ या खटल्यातील सर्वात मोठा पुरावा ठरणार आहेत. सुनावणीनंतर निकम यांनी आरोपींच्या वकिलांवर खटला लांबवणे आणि दिशाभूल करणे असा गंभीर आरोप केला. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जानेवारी २०२६ रोजी होणार असून लवकरच प्रत्यक्ष साक्षीदारांची उलटतपासणी सुरू होईल.

## राम-जी योजनेसाठी दीड लाख हजार कोटींची तरतूद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विकसित भारत जी राम-जी योजनेसाठी एक लाख ५१ हजार कोटी रुपये तरतूद केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी मंगळवारी (दि. २३) दिली.

केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी एका व्हिडीओ संदेशात सांगितले की, आता १०० दिवसांऐवजी सव्वाशे दिवसांच्या रोजगाराची हमी ग्रामीण भागात सरकारने दिली आहे. मनरेगा या पूर्वीच्या योजनेच्या नावाखाली नवीन योजनेची जाणीवपूर्वक बदनामी केली जात आहे, मात्र योजनेत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्त्याचीही तरतूद आहे. ग्रामीण भागात पायाभूत सोयी सुविधा, जलसंवर्धन आणि आपत्ती प्रतिबंधक उपाययोजना उभारण्यावर योजनेचा भर राहील, असेही त्यांनी सांगितले.

## खालापुरात बिबट्याची अफवा

### सोशल मीडियावर एआयचे फोटो व्हायरल



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील पाली फाटा भागात रात्रीच्या वेळेस बिबट्याचा वावर असल्याचे फोटो व्हायरल झाले आहेत. वन विभागाने मात्र बिबट्या आल्याचा दावा फेटाळला आहे.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना घडल्यानंतर भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यातच रायगड जिल्ह्यातदेखील अलिबाग तालुक्यात नागाव आणि आक्षी साखर येथे बिबट्याच्या हल्ल्याच्या दोन घटना घडल्या, तर काही दिवसांनी अलिबाग-कार्लेखिंड मार्गावर राऊतवाडी येथे काही प्रवाशांना बिबट्या दिसल्याचे सांगितले जात आहे. जिल्ह्यात इतरही काही ठिकाणी बिबट्याचा वावर असल्याच्या पाऊलखुणा आढळून येत असल्याने लोक धास्तीमध्ये आहेत. अशातच बिबट्या आला या अफवेने खालापुरात जोर पकडला आहे.

दोन वर्षांपूर्वी खालापूर तालुक्यातील नावंडे गावात बिबट्या दिसला होता. त्यानंतर खालापूर शहराजवळ असलेल्या मुंबई-पुणे महामार्गावर खडी मशीननजीक बिबट्या आढळून आला होता. त्या ठिकाणी बिबट्याच्या पायाचे ठसेदेखील आढळून आले होते, मात्र त्या वेळेस बिबट्याने हल्ला केल्याची कोणतीही घटना घडली नव्हती.


सध्या खालापूर तालुक्यात एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमतेने तयार केलेले बिबट्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आले आहे. यामध्ये पाली फाटा येथील कारखान्याचा फलक दाखवून त्यासमोर बिबट्याचा वावर दाखवण्यात आला आहे, मात्र हा फोटो खोटा असून कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन वन विभागाने नागरिकांनी केले आहे.

## माथेरानमध्ये पहिल्यांदाच 'कमळ' फुलले

### नगरपालिका निवडणुकीत तीन उमेदवार विजयी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान गिरीस्थान नगर परिषदेची निवडणूक नुकतीच झाली असून भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गट महायुतीने राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उबाठा गट यांच्या शिवराष्ट्र पॅनलला धोबीपछाड दिला. यामध्ये भाजपचे तीन उमेदवार निवडून आले. यासह माथेरानमध्ये पहिल्यांदाच 'कमळ' फुलले आहे.


महायुतीकडून एकूण १० प्रभाग असलेल्या माथेरान नगरपालिका निवडणुकीत २० उमेदवार उभे करण्यात आले होते. यात १४ जागा शिवसेनेला, तर सहा जागा भाजपच्या वाट्याला आल्या. सहापैकी तीन जागी भाजपचे उमेदवार विजयी झाले आहेत. येथील प्रभाग क्रमांक चारमधून भाजपच्या प्रतिभा घावरे यांनी शिवसेना उबाठा गटाच्या उमेदवार समिना महापुळे यांचा पराभव करून विजय संपादन केला. प्रभाग सातमधून भाजपचे संतोष शेलार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार गिरीश पवार यांना मात दिली, तर प्रभाग १०मधून भाजपच्या प्रियांका कदम यांनी 'उबाठा'च्या गीता खाडे यांना धूळ चारली.

तीन नगरसेवकांसह भाजपने माथेरान नगरपालिकेत आपले खाते उघडले आहे. चार वर्षांपूर्वी म्हणजे मे २०२१ रोजी येथील काही नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर माथेरानमध्ये भाजपची पकड मजबूत होताना दिसत होती. येथे अनेक समाजोपयोगी उपक्रम भाजपच्या माध्यमातून राबविले जात होते. याच सगळ्या सामाजिक उपक्रमांची पोचपावती जनतेमधून त्यांना मिळाली असल्याचे बोलले जात आहे.

सर्व वरिष्ठ नेतेमंडळींच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व सहकाऱ्यांच्या पाठबळामुळे भाजपचे तीन नगरसेवक माथेरान पालिकेमध्ये विराजमान होणार असून या पर्यटनस्थळाच्या विकासासाठी महायुतीच्या माध्यमातून काम करणार आहेत. त्यांचे अभिनंदन होत आहे. अनेकांनी पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## अलिबाग-रोहा मार्गावर पुन्हा धावली 'लाल परी'

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा मार्गावरील प्रवाशांच्या प्रदीर्घ लढ्याला यश आले असून बंद असलेली एसटी बससेवा मंगळवार (दि. २३)पासून पुन्हा सुरू झाली. पूल धोकादायक असल्याच्या कारणास्तव मागील सहा महिन्यांपासून बससेवा बंद असल्याने प्रवाशांनी २५ डिसेंबर रोजी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता, ज्याची तातडीने दखल प्रशासनाकडून घेण्यात आली आहे.

ग्रामस्थ, विद्यार्थी आणि प्रवाशांनी दिलेल्या तीव्र आंदोलनाच्या इशाऱ्याची सार्वजनिक बांधकाम विभाग आणि परिवहन मंडळाने गंभीर दखल घेतली आहे. यापूर्वी ५ डिसेंबर रोजी निवेदन देऊनही कार्यवाही न झाल्याने नागरिक संतप्त होते. अखेर प्रशासनाने मंगळवारपासून बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे वलवली भेरसे येथे होणारे २५ डिसेंबरचे रस्ता रोको आंदोलन आता टळले आहे.



या मार्गावरील पूल धोकादायक असल्याने मागील सहा महिन्यांपासून ही सेवा बंद होती. पुल नादुरूस्त असल्याचे कारण देऊन बस वाहतूक बंद असतानाही डंपर, ट्रक आणि ट्रॅक्टर यांसारखी अवजड वाहने मात्र धावत होती, ज्यावर नागरिकांनी आक्षेप घेतला. बससेवेअभावी गोरगरीब विद्यार्थ्यांना खासगी वाहनाने महागडा प्रवास करावा लागत होता. त्यामुळे अनेकांच्या शिक्षणावर परिणाम होत होता, शिवाय आर्थिक भूर्दंडदेखील सहन करावा लागत होता. अखेर प्रवाशांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने बससेवा सुरू केली आहे.

**प्रवाशांना मोठा दिलासा**

बससेवा सुरू झाल्यामुळे अलिबाग आणि रोहादरम्यान प्रवास करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांची गैरसोय दूर झाली आहे तसेच महिला प्रवाशांना शासनाकडून मिळणाऱ्या प्रवास सवलतींचा लाभ पुन्हा घेता येईल. ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांमधून या निर्णयाचे स्वागत होत आहे. धोकादायक पुलांच्या ठिकाणी प्रशासनाने तातडीने पर्यायी मार्ग किंवा दुरूस्तीची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता बस मार्गस्थ होणार आहे. तरीही भविष्यात खंड न पडता ही सेवा नियमित सुरू राहावी, अशी मागणी या मार्गावरील प्रवाशांनी केली आहे.

# पुरंदर विमानतळामुळे औद्योगिक विकास -मुख्यमंत्री

## प्रकल्पबाधितांच्या मुलांसाठी कौशल्य विकास केंद्र व नोकरीत प्राधान्य

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यात अनेक उद्योग येण्यास इच्छुक असून त्यासाठी पुरंदर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. या विमानतळामुळे पुणे व परिसरातील औद्योगिक विकासाला प्रोत्साहन मिळेल. हे केवळ प्रवासी विमानतळ नसून कार्गो विमानतळही असल्याने नाशवंत मालाच्या व्यापारासाठी विशेष उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पुरंदर व परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार असून पुण्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) किमान दोन टक्क्यांची वाढ होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२३) येथे केले.



पुरंदर विमानतळ प्रकल्पाच्या बाधित सात गावातील ग्रामस्थांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज संवाद साधला. या वेळी माजी मंत्री विजय शिवतारे, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह पुरंदर विमानतळाच्या परिसरातील बाधित सात गावांचे ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर येथील विमानतळ हे महाराष्ट्र आणि पुण्याच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा सखोल विचार करून या विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

पुरंदर येथील एरोसिटी प्रकल्पामध्ये टीडीआर संदर्भातील सर्व लाभ दिले जातील. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना शंभर टक्के नोकरीत प्राधान्य दिले जाईल. भूसंपादनाचा दर अंतिम झाल्यानंतर त्या भागातील युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करून उद्योगांना आवश्यक कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल. तसेच प्रकल्पासंदर्भातील पूर्वी झालेल्या आंदोलनातील दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

### नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाचे दिले उदाहरण

राज्य शासनाने २०१४ नंतर जे प्रकल्प राबविले ते केवळ अन् केवळ राज्याच्या विकासासाठी व नागरिकांच्या हितासाठीच राबविले गेले. या प्रकल्पामधून कोणत्याही शेतकऱ्याला भूमिहीन करण्याचा कुठलाही उद्देश नाही. आतापर्यंत राबविलेले प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या भागातील शेतकरी, नागरिक समाधानी झाल्याचे दिसून आले आहे. एका विमानतळामुळे परिसरातील शेती, उद्योग, व्यापार यामध्ये मोठ्या संधी उपलब्ध होतात हे नवी मुंबई विमानतळ प्रकल्पामुळे दिसून आले आहे. त्यामुळे पुरंदर विमानतळ झाल्यानंतर नक्कीच या भागातील शेतकऱ्यांचा लाभ होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# 'त्या' आवाजाबाबत सोल्वे कंपनीकडून लपवाछपवी?

## रोठ बुद्रुक-रोठ खुर्द ग्रामस्थांचा आरोप

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात सोल्वे (सायस्कु) कंपनीमध्ये रविवारी दुपारी मोठ्या आवाजाचा धमाका झाल्याने कंपनीलगत असलेल्या रोठ बुद्रुक व रोठ खुर्द गावांतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कंपनीच्या अगदी शेजारीच ही गावे वसलेली असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सोल्वे (सायस्कु) कंपनीतील स्प्रे ड्रायर प्लांटमध्ये उत्पादन प्रक्रिया सुरू असताना अचानक प्रेशर वाढल्याने झाकण जोरात खाली आदळले. त्यामुळे रविवारी दुपारी ४ वाजून २० मिनिटांच्या सुमारास जोरदार धमाक्याचा आवाज झाला. या घटनेनंतर परिसरातील नागरिक घाबरून गेले. घटनेबाबत माहिती घेण्यासाठी ग्रामस्थांनी कंपनीकडे चौकशी केली असता, कंपनीकडून नेहमीप्रमाणे लपवाछपवीची उत्तरे देण्यात आली. कोणतेही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नाहीत, अशी उत्तरे कंपनीच्या गेटवरून देण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

या संदर्भात भाजपचे धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे यांनी प्रशासनाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. कंपनी लगतच रोठ बुद्रुक व रोठ खुर्द ही गावे आहेत. अशा घटना घडल्या की गावातील नागरिक पूर्णतः भयभीत होतात. आमच्या जिवाचा प्रश्न निर्माण होतो. कंपनीने घटनेची स्पष्ट माहिती दिली पाहिजे. अन्यथा कारखाना निरीक्षकांनी या कंपनीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच रविवारीच रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

याबाबत रोठ बुद्रुकचे सरपंच नितीन वारंगे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, आम्ही ग्रामपंचायतचे वतीने कंपनीमधील घटनास्थळी पाहणे केली असता जरी ही घटना कंपनीच्या परिसरात घडली असली तरीही या घटनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधित कंपनीला लवकरच लेखी पत्र देण्यात येणार आहे. कंपनीमध्ये जर अशी कोणतीही घटना घडली, तर त्याची कोणतीही पूर्वकल्पना किंवा माहिती ग्रामस्थांना दिली जात नाही. त्यामुळे ग्रामस्थांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कंपनीमध्ये कोणती रसायने (केमिकल्स) वापरली जातात, त्यांचे दुष्परिणाम काय होऊ शकतात आणि अशा परिस्थितीत कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत ग्रामस्थांना योग्य प्रशिक्षण (ट्रेनिंग) देणे अत्यंत आवश्यक आहे.

> **कंपनीकडून प्राथमिक माहिती घेतली असून सोमवारी प्रत्यक्ष कंपनीत जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. कंपनी अधिकाऱ्यांनी 'रिअक्शन प्रक्रियेत बिघाड झाल्याने मायनर एक्सप्लोजन झाला असण्याची शक्यता' व्यक्त केली असली, तरी प्रत्यक्ष पाहणीनंतरच वस्तुस्थिति स्पष्ट होणार आहे तसेच कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांना माहिती दिलीच पाहिजे असे त्यांनी सांगितले.**
> **-डी. डी. तांबोळी,**
> कारखाना निरीक्षक

# शेकापचे माजी उपसरपंच अविनाश पाटील शिवसेनेत

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रांजणखार डावली (नवखार) येथील शेकापचे माजी उपसरपंच अविनाश पाटील यांनी आज आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वावर, विकासाभिमुख कार्यपद्धतीवर व जनहितासाठी घेतल्या जाणाऱ्या ठोस निर्णयांवर विश्वास ठेवून प्रवेश केल्याचे त्यांनी सांगितले

आमदार महेंद्र दळवी यांनी अविनाश पाटील व सर्व कार्यकर्त्यांचे शिवसेनेत स्वागत केले. शिवसेना ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढणारी, विकासाला प्राधान्य देणारी संघटना असून, नव्याने सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून संघटनात्मक बळ अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पक्षप्रवेशावेळी उपस्थित मान्यवरांनीही आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे मार्गी लागल्याचे नमूद केले. ग्रामविकास, मूलभूत सुविधा, युवकांना संधी व महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या कामांमुळेच शिवसेनेवर जनतेचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.



# व्हिजिट माय पोलीस स्टेशनसाठी राज्यात ठाणे आयुक्तालयाची निवड

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र विधी प्राधिकरण मुंबई श्रीमती रेवती ढेरे यांचे अध्यक्षतेखाली व ग्लोबल फाउंडेशन यांचे वतीने व्हीजीट माय पोलीस स्टेशन या उपक्रमासाठी महाराष्ट्र मधुन प्रथम पोलीस आयुक्तालय ठाणे यांची निवड करण्यात आली होती.



सर्वसामान्य नागरिकांना पोलीसांचे कामकाज, पोलीस ठाणे विषयी असलेले गैरसमज, वगैरे इ. समन्वय साधणे व पोलीस दलाप्रती विश्वास वाढविणेकरिता प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीतील प्रतिष्ठित, वरिष्ठ, सर्व पोलीस कमिटी, शाळा, कॉलेज, कलाकार, डॉक्टर अशा जास्तीत जास्त नागरिकांना पोलीस ठाणे भेट देऊन सहभागी करून माहिती देणेत आली.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात व्हीजीट माय पोलीस स्टेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. ठाणे न्यायलय येथे मा.आगरवाल, मुख्य न्यायाधिश, ठाणे न्यायालय, आशुतोष डुंबरे पोलीस आयुक्त, ठाणे शहर व इतर मान्यवरांचे उपस्थितित पारितोषिक समारंभ झाला. ठाणे पोलीस आयुक्तालयातील कासारवडवली पोलीस ठाणेस द्वितीय क्रमांक मिळाला. या वेळी वपोनि एन. बी. कोल्हटकर यांनी स्वीकारला या वेळी अभिनेते मंगेश देसाई उपस्थित होते.

# भाजपला पसंती! पक्षप्रवेश सुरूच

**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला आहे. पिंपरी चिंचवड विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) गटाचे उमेदवार, माजी नगरसेवक राहुल कलाटे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी आमदार शंकर जगताप, पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगरमध्येही भाजपात इनकमिंग झाली आहे. उबाठा गटाचे माजी नगरसेवक तथा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष रेणुकदास उर्फ राजू वैद्य आणि छत्रपती संभाजीनगरचे उबाठाचे विधानसभा संघटक अक्षय खेडकर यांनी भाजपत प्रवेश केला. या वेळी मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. भागवत कराड, भाजप महाराष्ट्र प्रदेश महामंत्री आमदार संजय केनेकर, छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे आदी उपस्थित होते.

# मेळघाट येथे ढगफुटीच्या घटनेत शहीद जवानांच्या कुटुंबियांना एक कोटींची मदत

**नवी दिल्ली :** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) ने भारतीय स्टेट बँक (SBI) यांच्या सहकार्याने जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड येथे १४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या दुर्दैवी ढगफुटीच्या घटनेत प्राण गमावलेल्या दोन CISF कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना वैयक्तिक अपघात विम्यांतर्गत १ कोटी रुपयांची अतिरिक्त आर्थिक मदत प्रदान केली आहे.

CISF चे उपमहानिरीक्षक (जनसंपर्क अधिकारी) सरोज भुंदे यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, १४ ऑगस्ट २०२५ रोजी ७व्या रिझर्व बटालियन, किश्तवाड येथील प्रधान आरक्षक/जीडी आनंद कुमार आणि प्रधान आरक्षक/जीडी मनोज कुमार विशाल यांची विश्रांती गावामध्ये अंतर्गत सुरक्षा ड्युटीसाठी तैनाती करण्यात आली होती. कर्तव्य बजावत असताना अचानक आणि तीव्र ढगफुटीमुळे परिसरात भीषण पूरस्थिती निर्माण झाली.

दोन्ही जवानांच्या तत्परतेमुळे, शौर्यामुळे आणि कर्तव्यनिष्ठेमुळे अनेक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आणि निरपराध लोकांचे प्राण वाचवण्यात यश आले. दुर्दैवाने, या मानवीय कार्यादरम्यान दोन्ही जवान तीव्र पुराच्या प्रवाहात वाहून गेले आणि कर्तव्य बजावत असताना त्यांनी सर्वोच्च बलिदान दिले.

CISFचे महासंचालक प्रवीर रंजन यांनी SBI चे अधिकारी - सुचित्रा जैन, अरुण कुमार आणि अभिषेक कुमार यांच्या उपस्थितीत शहीद आनंद कुमार यांच्या पत्नी मधु शर्मा आणि मनोज कुमार विशाल यांच्या पत्नी सुमिता विशाल यांना SBI-CISF विमा लाभ प्रदान केला.

# नवी मुंबई विमानतळावरून उद्या पहिली उड्डाण सेवा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबर २०२५ रोजी येथून पहिली विमानसेवा सुरू होत आहे. नवी मुंबई, महाराष्ट्र तसेच संपूर्ण देशासाठी हा स्वप्नपूर्तीचा क्षण आहे.



या ऐतिहासिक प्रसंगी बोलताना सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संचालनास प्रारंभ होणे हे महाराष्ट्र शासन व सिडकोची पायाभूत सुविधा विकासाबाबतची सातत्यपूर्ण बांधिलकी अधोरेखित करते. या प्रकल्पामध्ये नियोजनापासून प्रत्यक्ष कार्यान्वयनापर्यंत अनेक दशकांचा प्रवास असलेल्या या प्रकल्पामध्ये अत्यंत काटेकोर नियोजन, विविध यंत्रणांमधील समन्वय आणि अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळतो. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील हवाई वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, नियोजित मल्टी-एअरपोर्ट प्रणाली अधिक सक्षम होणार आहे.

महाराष्ट्र शासनाने सिडकोसोबत मिळून या ऐतिहासिक प्रकल्पासाठी आवश्यक ठरलेल्या उत्कृष्ट समन्वय आणि सामायिक दूरदृष्टीची दखल घेतली आहे. महाराष्ट्र शासन, सिडको, अदानी समूह आणि एनएमआयएल यांच्यातील सुरळीत व प्रभावी समन्वयामुळे आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आधुनिक विमानतळ पायाभूत सुविधांचा एक मानदंड ठरला असून, महाराष्ट्र व देशासाठी अभिमानास्पद नवे प्रवेशद्वार म्हणून उभा राहिला आहे.

हे विमानतळ कार्यान्वित झाल्याने नवी मुंबईतील नागरिकांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर, जलद आणि सुलभ होणार आहे. तसेच पुणे, ठाणे, पनवेल, रायगड तसेच कोकणातील इतर भागांतील नागरिकांनाही देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासासाठी मोठा लाभ मिळणार आहे.

**अशी असेल विमानसेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबर २०२५ पहिल्या दिवशी एकूण ३० एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्स करतील. यात विमान कंपनी - इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, आकासा एअर व स्टार एअर सहभागी आहेत. पहिले आगमन: ६ए ४६० - बेंगळुरू येथून - सकाळी ०८.०० वाजता तर पहिले प्रस्थान: ६ए ८८२ - हैदराबादकडे - सकाळी ०८.४० वाजता असेल.

**पान १ वरुन**

## मान्यवरांच्या उपस्थितीत रामबागचा वर्धापन दिन उत्साहात

वर्धापन दिनानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई, उत्तम नियोजन आणि लहानग्यांपासून युवक, महिला, ज्येष्ठांच्या उपस्थितीने रामबाग नंदनवनाप्रमाणे फुलली होती. या वेळी आयोजित श्री सत्यनारायण महापूजेचे हजारो नागरिकांनी दर्शन तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला. या ठिकाणी सादर झालेल्या पप्पू सूर्यराव, स्टेप आर्ट इंटरटेन्मेन्ट निर्मित व सनी संते प्रस्तुत हिच खरी आगरी कोळ्यांची दौलत या पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांच्या बहारदार कार्यक्रमाने वातावरणात रंगत आणली.

या वेळी बोलताना खासदार धैर्यशील पाटील यांनी म्हटले की, मी लहानपणापासून रामशेठ काकांना पाहिलेले आहे. त्यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आपल्याला उपस्थितीत राहता आले हे माझ्यासाठी भाग्य आहे. समाजात धनवान खूप आहेत, पण आपले ऐश्वर्य लोकांच्या उपयोगी येईल याचा विचार लोकनेते रामशेठ ठाकूर करतात. १४ एकरच्या या जागेत कधीही झाडे उगवली नसतील, ती उगविण्याचे काम होत माणसाच्या आनंदाची इको सिस्टीम या ठिकाणी तयार झाली आहे. आपल्या सर्वांसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर आदर्श असून या विभागाचा ते कणा आहेत.

आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, रामबाग हे निसर्गरम्य असे पर्यटनस्थळ आहे. लोकांसाठी उभारलेल्या या उद्यानाचा खर्च लोकनेते रामशेठ ठाकूर स्वतः करत आहेत. त्यामुळे असे दानशूर व्यक्तिमत्व कुठेही भेटणार नाही. गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांचा उपयोग होत आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा!

कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील म्हणाले की, जीवन तीन पानांचे असते. पहिले पान म्हणजे आपला जन्म जो ईश्वराने लिहून आपल्याला दिलेला असतो. तिसरे पान म्हणजे मृत्यू तोसुद्धा ईश्वराने आधीच निश्चित केलेला असतो, पण यामधील एक महत्त्वाचे पान आपल्या हातात असते ते म्हणजे मधले पान आपले आयुष्य कसे घडवायचे, कसे जगायचे आणि काय मागे ठेवायचे हे ठरवणारे पान आहे. हे मधले पान आपण कशा प्रकारे भरतो यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची किंमत ठरते. काही लोक हे पान रिकामे ठेवतात, काही साध्या ओळीत भरतात, तर काही थोर व्यक्ती आपल्या कर्माने, विचाराने आणि कार्याने हे पान सुवर्णाक्षरांनी भरून ठेवतात आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरभरून ठेवले असून त्याचा आदर्श त्यांच्याकडून घ्यावा लागेल. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही मनोगत व्यक्त केले.

> **लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जन्म आणि बालपण न्हावाखाडी येथे झाले. गावाला काही तरी दिले पाहिजे या भावनेतून आणि ग्रामस्थ, म्हसेश्वर मंदिर कमिटीच्या संकल्पनेतून रामबागची उभारणी झाली. अटल सेतूमुळे हा भाग मुंबईशी जवळ जोडला गेला. निसर्गरम्य सौंदर्य या ठिकाणी असल्याने येथून ये-जा करणाऱ्या लोकांना रामबागचे आकर्षण झाले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अविरतपणे सामाजिक कार्य सुरू आहे. या परिसराच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य लाभले आहे आहे आणि ते यापुढेही मिळत राहील.**
> **-प्रशांत ठाकूर, आमदार**

> **लोकनेते रामशेठ ठाकूर हे दूरदृष्टी असलेले नेते आहेत. त्यांनी लोकांसाठी लोकसेवेचे साम्राज्य उभारले. लोकांसाठी दुबईच्या धर्तीवर असलेल्या मिरॅकल गार्डनची प्रतिकृती उभारली आहे. शाळा हे व्यवसाय म्हणून काही जण बघतात, पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षणाचे जाळे गोरगरिबांसाठी केले आहे. ते शिक्षणमहर्षी, शिक्षणतपस्वी आहेत हा अभिमान आपल्यासाठी खूप मोठा वाटतो. माणसे आणि समाज तोच असतो, पण माणसे जोडण्याची ताकद लागते. ते माणसे जोडणारे व्यक्तिमत्व आहेत. त्यामागे प्रचंड तपश्चर्या आहे आणि त्याचे सर्वजण साक्षीदार आहोत.**
> **-बाळासाहेब पाटील, माजी सभापती, कोकण म्हाडा**

# मणेरकर रचित पुस्तकाचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

मणेरकर रचित या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच बोरीवली येथील प्रबोधनकार ठाकरे लघु नाट्यगृहात झाले. या वेळी पंडित अजित कडकडे यांनी गोमंतकातील कवी, नट, नाटककार, नाट्येतिहासाच्या साधन सामग्रीचे संग्राहक म्हणून गौरवलेले अभ्यासक दिवंगत सीताराम गणपती मणेरकर यांनी रचलेले श्रीमद् भगवद्गीता संगीतामृत हे महाकाव्य नाट्यपद रचनेतील चमत्कारच आहे, असे गौरवोद्गार काढले.


पंडित कडकडे पुढे म्हणाले, श्रीमद् भगवद्गीता या ग्रंथाचा जगातील अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे, परंतु रामायणाचे जसे मराठीत गीत रामायण झाले तसे गीतेचे मराठी काव्य रूपांतर झालेले माझ्या तरी वाचनात नाही. मेघदूताचा समश्लोकी अनुवाद अनेकांनी केलेला आहे, परंतु गीतेचा समश्लोकी अनुवाद झाल्याचे आढळत नाही. संगीत नाटकातील नाट्यपदांच्या चालीवर गीतेचा अनुवाद करणे म्हणजे अभिनव आणि स्तुत्य कार्य आहे. जे सीताराम मणेरकर यांनी समर्थपणे करून ठेवले आहे. यातील बरीचशी नाट्य पदे आज अज्ञात असली तरी जी आम्हाला माहित आहेत ती गाऊन पाहिल्यावर मणेरकर यांचे भाषा प्रभुत्व, संगीताचे ज्ञान, नाट्यपदांचा सखोल अभ्यास इत्यादी सर्व पाहून मी अवाक झालो, असे कडकडे म्हणाले.

सीताराम मणेरकर यांनी श्रीमद् भगवद्गीतेचे १८ अध्याय नाट्यपदांच्या चालीवर या पुस्तकात अधोरेखित केले आहेत. या विदुषी अर्चना कान्हेरे यांनी या पुस्तकातील पदांचे गायन केले. कुमुद विद्यामंदिरच्या संस्थापिका मीना पाटील यांनी आशीर्वादपर आपले मनोगत व्यक्त केले. स्नेहा माणगावकर आणि सुनंद मणेरकर यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

## दुखवटा

### दत्तात्रेय मेथा

**माणगाव :** माणगाव शहरातील जे. बी. डी. प्लाझा येथील रहिवाशी उद्योजक प्रितेश मेथा यांचे वडील दत्तात्रेय बाळकृष्ण मेथा यांचे वयाच्या ७५व्या वर्षी बुधवारी (दि.१७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे.



कै. दत्तात्रेय मेथा हे प्रेमळ स्वभावाचे, शांत, मनमिळावू व्यक्तिमत्व होते. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२६) व उत्तरकार्य रविवारी (दि.२८) श्रीमती सरलादेवी मंगल कार्यालय माणगाव येथे होणार आहेत.

# वेश्या व्यवसायातून महिलांची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

वेश्या व्यवसायातुन एक बांगलादेशी अल्पवयीन पिडीत मुलगी व सहा पिडीत महिला (त्यापैकी दोन बांगलादेशी) महिलांची गुन्हे शाखेतील पोलिसांनी सुटका केली आहे.

पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्याचे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, तळोजा एमआयडीसी येथील हॉटेल नवनाथ इन या लॉजिंगचा मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकाकडुन २००० रूपये घेवुन लॉजमधील रूममध्ये



ठेवलेल्या महिला दाखवुन, त्या महिलांकडुन वेश्या व्यवसाय करून घेत आहे. वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास हॉटेल नवनाथ इन या लॉजिंगमध्ये पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी एक अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व सहा पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या.

लॉज मालक वसंत शेटटी, लॉज मॅनेजर गिरीश शेटटी, सर्व्हिस बॉय रोशन यादव यांनी अल्पवयीन मुलीस व पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवल्या. सर्व्हिस बॉय रोशन याने त्यांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन २००० रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले. आरोपी वसंत गणेश शेट्टी (लॉज मालक, गिरीश विठठल शेट्टी (लॉज मॅनेजर), रोशन रामजित यादव (सर्व्हिस बॉय) यांनी आपसात संगनमत करून एक अल्पवयीन बांगलादेशी मुलगी व सहा महिलांपैकी दोन बांगलादेशी पिडीत महिलांना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉजचा वेश्या व्यवसायासाठी वापर केला. म्हणून वरील तीन आरोपी विरूध्द भा. न्या.सं. कलम १४३ (३), १४३ (४), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३. ४, ५, सह POCSO कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे.

ही कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी पृथ्वीराज घोरपडे, हवालदार मांडोळे, शिपाई ठाकूर, चव्हाण, पारासुर, कोलते, हवालदार सविता म्हात्रे, मनिषा पावडे, चालक पोहवा हाडे यांनी केली आहे.

## पनवेलमध्ये जमावबंदीचा आदेश

**पनवेल :** निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजीचे अधिसुचनेनुसार महानगरपालिका निवडणुक २०२५ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून नवी मुंबई पोलीस आयुक्तायामधील नवी मुंबई महानगरपालिका पनवेल महानगरपालिका निवडणुकीकरीता २३ ते ३० डिसेंबर २०२५ रोजीपर्यत निवडणुक कार्यक्रमांतर्गत उमेदवार किंवा त्यांच्या कोणत्याही सुचकाकडून नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार आहे.

तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा २ जानेवारी २०२६ आहे. त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष नामनिर्देशन पत्र सादर करतेवळी उमेदवारांच्या समर्थनार्थ शक्ती प्रदर्शन करणे, विविध वाहनांचा वापर करणे, घोषणाबाजी करणे यामुळे किरकोळ कारणावरून वाद निर्माण होवून पक्ष कार्यकर्त्यामध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते तसेच रहदारीच्या नियमनात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता आहे.

यानुसार पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, नवी मुंबई रश्मी नांदेडकर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामधील पनवेलमध्ये जमावबंदी आदेश जारी केले आहे.

## लोकलमधून मुलीला ढकलणाऱ्या आरोपीला न्यायालयीन कोठडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील एका विद्यार्थिनीला धावत्या लोकलमधून ढकलून दिल्याप्रकरणी संशयिताला न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

गुरुवारी (दि.१८) सकाळी आठ वाजता पनवेलहून मुंबईकडे जाणाऱ्या लोकलमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी संशयिताची तीन दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. पनवेल येथे राहणारी ही विद्यार्थिनी आपल्या मैत्रिणीसोबत खारघर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी महिलांच्या डब्यातून प्रवास करत होती.

याचवेळी या डब्यात घुसखोरी करणाऱ्या एका माथेफिरूला डब्यातील महिलांनी जाब विचारला. त्याचा राग मनात धरत आरोपीने दरवाजात उभ्या असलेल्या या पीडित विद्यार्थिनीला थेट धावत्या लोकलमधून बाहेर ढकलले. आरडाओरड करत प्रवाशांनी तत्काळ आपत्कालीन साखळी ओढली. प्रवाशांच्या मदतीने जखमी विद्यार्थिनीला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात प्राथमिक उपचार झाल्यानंतर तिची प्रकृती स्थिर असल्याने तिला घरी सोडण्यात आले आहे. तिच्या डोके, कंबर आणि हातापायांना दुखापत झाली होती. दरम्यान, माहिती मिळताच जीआरपी पोलिसांनी खांदेश्वर रेल्वे स्थानकात सापळा रचून संशयीत आरोपी शेख अख्तर नवाज शेख (वय ५०) याला अटक केली. तो मूळचा मुंबईतील खार रोड परिसरातील असून कायमस्वरूपी फिरस्ता असल्याचे तपासात उघड झाले.

## एमएनएम विद्यालयात ख्रिसमस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात ख्रिसमस सण साजरा करण्यात आला.

ख्रिसमस दिनाचे औचित्य साधत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागासाठी विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी ख्रिसमस निमित्त आकर्षक सजावट केली. विद्यार्थिनींनी ख्रिसमस कॅरोलचे गायन केले. तसेच विविध नृत्य प्रकारांचे सादरीकरण केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना ख्रिसमस या सणाचे महत्व सांगत, दयाभाव, क्षमाशील वृत्ती, परस्पर सहकार्य, यांचा जीवनामध्ये उपयोग करावा तसेच ख्रिसमस हा एक धार्मिक सण नसून मानवतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारा आहे असे सांगितले.



माध्यमिक विभागाच्या शिक्षिका जयश्री देशमुख यांनी विद्यार्थ्यांना ख्रिसमस सणाचे महत्त्व व ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिंगल बेल जिंगल बेल च्या तालावर नृत्य सादर केले. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत होता. विद्यार्थ्यांच्या वेशातील सांता क्लॉजने विद्यार्थ्यांना चॉकलेट, मिठाई तसेच निरनिराळ्या भेटवस्तू दिल्या.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना ख्रिसमस सणाच्या शुभेच्छा दिल्या.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात उड्डाण महोत्सव आणि प्रशिक्षण कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.२३)आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे उडाण महोत्सव व स्पर्धेच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेला प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात व यशस्वीरीत्या पार पडला.



या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासास चालना देणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे तसेच स्पर्धात्मक वातावरणाची ओळख करून देणे हा होता. या कार्यक्रमामध्ये प्रा. महेश धायगुडे समन्वयक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व प्रा. योगिता पाटील यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच या कार्यक्रमादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला व प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

कार्यक्रमासाठी आवश्यक ती परवानगी देऊन सातत्यपूर्ण मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य केल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मॅडम यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले व त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे व सकारात्मक दृष्टिकोनामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविणे शक्य झाले, असे आयोजकांनी नमूद केले तसेच या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या नियोजन, आयोजन व अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे उडाण महोत्सव व स्पर्धा अंतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी झाला.

## 'सीकेटी'च्या प्रशांत मोरे यांना अवॉर्ड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे (सीकेटी) प्राचार्य प्रशांत मोरे यांना ज्युनिअर कॉलेज मधील त्यांचे उल्लेखनीय कार्य व प्रभावी नेतृत्वासाठी पिल्लई युनिव्हर्सिटी नवीन पनवेल तर्फे प्रतिष्ठित ॲकॅडमीक लीडरशिप एक्सलन्स अवॉर्ड २०२५ सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

ज्युनिअर कॉलेजचा उत्तम शैक्षणिक निकाल, क्रीडा स्पर्धातील चमकदार कामगिरी, विविध उपक्रम, विज्ञान प्रदर्शन, आधुनिक अध्यापन पद्धती, शिस्तबद्ध व्यवस्थापन, पालक शिक्षक विद्यार्थी समन्वय या सर्व घटकांचा समन्वय प्राचार्यांनी उत्तमपणे साधला आहे. त्यामुळेच ते या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.हा पुरस्कार निश्चितच ज्युनिअर कॉलेजच्या उज्वल भविष्यासाठी



प्रेरणादायी ठरणार आहे.

प्राचार्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची एआय प्रदर्शन शैक्षणिक भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता अकरावी विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'एआय प्रदर्शन' ही शैक्षणिक भेट शनिवारी (दि.२०) आयोजित करण्यात आली होती. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कृत्रिम बुध्दीमत्तेचे मूलभूत तत्वज्ञान, त्यांचे विविध उपयोग, तसेच भविष्यातील संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.



प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाव्दारे एआय तंत्रज्ञान कसे कार्य करते हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले, ज्यामुळे त्यांची वैज्ञानिक जिज्ञासा अधिक वाढली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना इंटिरीयर डिझाइन आणि फॅशन डिझाइन या क्षेत्रातील करिअर संधीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या क्षेत्रामध्ये आवश्यक कौशल्ये, शिक्षणाचे विविध पर्याय, तसेच रोजगाराच्या आणि उदयोजकतेच्या संधी यांची माहिती तज्ञांनी दिली. सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या या क्षेत्रभेटीचा विद्यार्थ्यांना भविष्यात नक्कीच फायदा होईल. या क्षेत्र भेटीस प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

## बल्करच्या धडकेत पती-पत्नीचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पळस्पेकडून पेणकडे जाणाऱ्या गोवा महामार्गवरील क्षणभर विश्रांती हॉटेलसमोर एका बल्करने ओला कंपनीच्या इलेक्ट्रीक स्कुटीस धडक दिली. या अपघातात गाडीवरील पती–पत्नीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

बल्कर (एमएच ४६ सीयु २३०६) ही घेऊन चालक क्षणभर विश्रांती हॉटेल समोरील पेणकडे जाणाऱ्या रोडवर विरूध्द दिशेने जात होता. या वेळी त्याने स्कूटी (एमएच ४६ सीटी ७१२२) हीस धडक



दिल्याने झालेल्या अपघातात गाडीवरील विद्या विठठल गायकर (वय ५१) या जागीच मयत झाल्या तर त्याचे पती विठठल गायकर (वय ५४, रा. डोलघर, पोस्ट बारापाडा) हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता तेथे त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मार्बलच्या देवघरांना पसंती



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी घराघरांत लाकडाचे देवघर बघायला मिळायचे. घर थोडेफार साधे असल्यास सागाचे देवघर पाहायला मिळायचे. परंतु बदलत्या काळात घराबरोबरच देवघरांच्या रुपातही बदल झालेला दिसतो. आता बहुतांश घरांमध्ये लाकडाऐवजी मार्बल अथवा ग्रॅनाईटचे देवघर पहायला मिळत आहेत. मजबूत टिकावू आणि कीड लागण्याचा धोका नसल्याने या देवघरांना पसंती दर्शवण्यात येत आहे. पर्यावरणाचा हास टाळण्यासाठी जंगलतोडीस मनाई आहे. त्यामुळे चांगल्या प्रतीचे लाकूड उपलब्ध होत नसल्याने लाकडाची देवघरे दुर्मीळ होऊ लागली आहेत.

मार्बलचे देवघर आणि त्यावरील नक्षीकाम पाहताक्षणी चित्त वेधणारे आणि उत्तम कलाकुसर केलेले असते. हे देवघर अगदी १००० रुपयांपासून ७००० रुपयांपर्यंत उपलब्ध असल्याचे विक्रेत्याने सांगितले. तुलनेने मार्बल, ग्रॅनाईटची मंदिरे मजबूत, साफसफाई करण्यास सोयीची आणि टिकावू असल्याने ग्राहकांकडून या देवघरांना मोठी पसंती दर्शवण्यात येत असल्याचे रसायनीतील एका देवघर विक्रेत्याने सांगितले.

हल्ली घरात अद्ययावत सोयीसुविधा, मॉड्युलर किचनवर जास्त लक्ष दिले जाते. त्याचबरोबरच देवघरही प्रसन्न, मन शांत करणारे असावे याकडे कल असतो. पांढऱ्या शुभ्र मार्बलमुळे देवघर अधिकच सुंदर दिसत असून घरातील वातावरणही प्रसन्न राहते. त्यामुळे मार्बलचे देवघर खरेदी करीत असल्याचे एका ग्राहकाने सांगितले.

## दिनदर्शिका प्रकाशन



**पनवेल : नंदकिशोर धोत्रे चॅरिटेबल ट्रस्ट आणि तसेच पत्रकार संरक्षण समिती, अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती, वृत्तपत्र शिवानंद, मल्हार न्यूज, लायन्स क्लब ऑफ पनवेल, या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने तयार केलेले वर्ष २०२६च्या दिनदर्शिकेचे उद्घाटन माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नंदकिशोर धोत्रे, नूतन धोत्रे उपस्थित होते.**

## अभिष्टचिंतन



**पनवेल : मल्हार नेटवर्क प्रा.लि.चे संचालक स्वप्नील ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या.**



## आधुनिक युगातही पारंपरिक बुजगावण्याला पसंती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेतामध्ये कडधान्य पेरल्यावर शेतकऱ्याला जंगलातील रानटी प्राण्यांची भीती असते, शिवाय पक्षीही शेतामध्ये पेरलेल्या कडधान्याची नासधूस करीत असतात. पूर्वीपासून शेताचे संरक्षण करण्यासाठी बुजगावणे शेतात उभे केल्यामुळे कडधान्य पिकांचे नुकसान टळले जाते.

सातत्याने पिकांचे रक्षण करणे हे शेतकऱ्याला शक्य नसते. तसेच शेतामध्ये पेरलेल्या कडधान्याने बहरल्याने त्यांच्या सुवासाने, रानटी पक्षी, प्राणी मोकाट गुरे शेतात प्रवेश करतात. त्यामुळे शेतकऱ्याला मोठे नुकसान सहन करावे लागते. ते होऊ नये म्हणून शेतकरी शेतात बुजगावणे उभे करून पिकांची होणारी नासधूस थांबवित आहेत.

बुजगावणे माणसाप्रमाणे दिसत असल्याने शेतात रानटी पक्षी, प्राणी मोकाट गुरे प्रवेश करत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याला या बुजगावण्यापासून मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे.

शेतकरी शेतामध्ये वाल, मूग, हरभरे, मटकी, मका, भाजीपालाही पिकवत आहेत. बुजगावणे या पिकांचे संरक्षण करीत आहेत.

## संपादकीय

# व्याख्येला अकारण विरोध

अरवली पर्वतरांग ही जगातील सर्वात जुन्या भूगर्भीय रचनांपैकी एक आहे. केंद्र सरकारच्या शिफारशींनंतर सर्वोच्च न्यायालयाने अरवलीची नवीन व्याख्या मान्य केली असून गैरसमजुतीतून त्याला विरोध सुरू झाल्याचे दिसते. अरवलीची नवीन व्याख्या तिचे संरक्षण कमी करण्यासाठी नसून उलट नियम अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्वत्र एकसमानता आणण्यासाठी आहे हे केंद्रसरकारने स्पष्ट केले आहे. ही पर्वतरांग हिरवीगार राखण्यासाठी सरकार पूर्णत: कटिबद्ध आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयातील महत्त्वाचे मुद्दे लोकांपर्यंत पोहचवले पाहिजेत.

**अरवली पर्वतरांग राजस्थान, हरियाणा, गुजरात आणि दिल्लीपर्यंत पसरलेली असून ती उत्तर भारताच्या पर्यावरण, हवामान आणि जीवनव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. हा प्रदेश थार वाळवंट आणि उत्तर भारत यांच्यामध्ये नैसर्गिक अडथळ्याचे काम करतो. केंद्र सरकारच्या शिफारशींनंतर सर्वोच्च न्यायालयाने अरवलीची नवीन व्याख्या मान्य केली आहे. नव्या व्याख्येनुसार आजूबाजूच्या जमिनीपेक्षा किमान १०० मीटर उंच भागच अरवली पर्वत मानला जाणार आहे. जागतिक स्तरावर भूविज्ञानतज्ज्ञ रिचर्ड मर्फी यांनी दिलेली मानक व्याख्या स्वीकारली जाते. त्यानुसारच १०० मीटर उंचीची रचना 'पर्वत' मानली जाते. यात शिखरापासून जमिनीच्या पातळीपर्यंतचा संपूर्ण १०० मीटरचा भाग संरक्षित केला जातो. या व्याख्येनुसार अरवलीतील सुमारे ९० टक्के क्षेत्र सुरक्षित आहे. राजस्थानमधील अरवली पर्वतरांगेबाबत सुरू असलेल्या वादावर केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामानबदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केंद्र सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. अरवली क्षेत्रात कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही आणि पुढेही दिली जाणार नाही. ही योजना केवळ अरवलीच्या संरक्षणासाठी आहे असे यादव यांनी म्हटले आहे. याआधी स्पष्ट व्याख्या नसल्याने खाणकाम परवानग्यांमध्ये अनियमितता दिसत होती. अरवली क्षेत्रातील सुमारे ५८ टक्के भाग शेतजमीन असून उर्वरित भागात शहरे आणि गावे आहेत. याशिवाय सुमारे २० टक्के क्षेत्र संरक्षित असून तिथे कोणत्याही स्वरुपाच्या कृतीला मनाई आहे. तरीही काही लोकांनी गैरसमजुतीतून नव्या व्याख्येला विरोध सुरू केला आहे. अर्थातच विरोधी राजकीय पक्ष यात पुढे आहेत. नवीन व्याख्येमुळे खाणकाम व बांधकामांना मार्ग मोकळा होईल आणि पर्यावरण व निसर्गावर त्याचा मोठा परिणाम होईल अशी आवई त्यांनी उठवली आहे. अरवलीची व्याख्या फक्त उंचीच्या आधारावर केल्यास १०० मीटरपेक्षा लहान असलेल्या अनेक टेकड्यांवर खाणकाम आणि बांधकामाला परवानगी मिळेल व त्यातून या भागात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होईल असा विरोधात आंदोलन करणाऱ्यांचा दावा आहे. वास्तविक अशी शहरीकरणाची कोणतीही योजना नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. जर दोन किंवा त्याहून अधिक टेकड्या ५०० मीटरच्या आत असतील आणि त्यांच्या मधोमध जमीन असेल तर त्या टेकड्यांना देखील अरवली पर्वतरांगांचा भाग मानले जाईल हेही सरकारने स्पष्ट केले आहे. अरवली पर्वतरांगा या उत्तर-पश्चिम भारतात वाळवंटीकरण रोखण्याच्या दृष्टीने, भूजलसाठा वाढवण्याकरिता आणि स्थानिक लोकांच्या उपजीविका टिकवण्यात महत्त्वाचे योगदान देतात हे खरेच आहे. अरवलीतील टेकड्या किंवा पर्वतरांगांमध्ये नवीन खाणकाम परवाने दिले जाणार नाहीत. जुने परवानेही शाश्वत खाणकामाचे नियम पाळतील तेव्हाच सुरू राहतील हेही सरकारने स्पष्ट केले आहे. या पर्वतरांगांमधील संरक्षित जंगले, पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आणि पाणथळ जागांवर खाणकामांना पूर्ण बंदी आहे.**

# राष्ट्रीय ग्राहक दिन : सुलभ, डिजिटल न्यायाकडे वाटचाल

भारतात २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. १९८६मध्ये याच २४ डिसेंबरला अनोखा असा ग्राहक संरक्षण कायदा भारतीय संसदेने ग्राहकांना दिला. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी जिल्हा राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर एकीकडे ग्राहक संरक्षण परिषदांची तरतूद करण्यात आली, तर दुसरीकडे याच तीन स्तरांवर ग्राहक न्यायालयांची स्थापना करण्यात आली, जेणेकरून ग्राहकांच्या छोट्या-मोठ्या तक्रारींचे सहज, सुलभपणे, कायद्याचे अवडंबर न वाजवता कमीत कमी खर्चात, विना विलंब निवारण होईल. केवळ ३० कलमे असलेल्या या सोप्या सुटसुटीत कायद्याचे आम्ही 'ग्राहकांसाठी अल्लादिनचा दिवा' म्हणून स्वागत केले.



३९ वर्षानंतर आज या कायद्याचे मूल्यमापन करताना चित्र काय दिसते? या कायद्यामुळे ग्राहकांमध्ये बऱ्यापैकी जागृती निर्माण झाली असे म्हणायला हरकत नाही. एकट्या दुकट्या ग्राहकाने मोठमोठ्या कंपन्या, बिल्डर्स, डॉक्टर्स, गुंतवणूक कंपन्या, बँका, रेल्वे, टेलिफोन कंपन्या, विमा कंपन्या यांना त्यांच्या निकृष्ट सेवा आणि हलगर्जीपणाबद्दल त्यांना ग्राहक न्यायालयात खेचून न्याय मिळवल्याची अनेक उत्साहवर्धक उदाहरणे आढळतील. तसेच सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा अनेक प्रकरणात ग्राहकाभिमुख भूमिका घेऊन अनेक ऐतिहासिक निर्णयांद्वारे ग्राहकांना आणि भारतीय ग्राहक चळवळीला सबळ आणि सक्षम केले यात वाद नाही, परंतु कालांतराने ग्राहक न्यायालयातील दिरंगाई, सुनावणीच्या वेळी तारीख पे तारीख, अध्यक्ष आणि सदस्यांच्या नेमणुकांस विलंब, अपुरा कर्मचारी वर्ग, संसाधनांचा अभाव अशा अनेक कारणांमुळे आज देशातील ग्राहक न्यायालयात साडेपाच लाखाहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याहूनही चिंताजनक बाब म्हणजे या सर्व प्रलंबित प्रकरणांचा कालावधी हा दोन ते तीन वर्षांपासून चक्क २० ते २५ वर्षांपर्यंत आहे. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्याचा सहज, सुलभ आणि जलद न्यायाचा मुख्य उद्देश पराभूत होताना दिसत आहे.

मुंबई ग्राहक पंचायत या क्लेषदायक परिस्थितीबाबत केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाकडे गेली काही वर्षे चिकाटीने आणि सातत्याने पाठपुरावा करत आहे. सुदैवाने गेल्या एक, दोन वर्षात याबाबतीत केंद्रीय स्तरावर सकारात्मक घडामोडी घडत आहेत. यंदाचा राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त दिल्ली येथे आयोजित कार्यक्रम ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम व जलद निवारण : डिजिटल न्यायाच्या माध्यमातून या विषयावर केंद्रित केला आहे.

**ई-जागृती : डिजिटल उपायांची दिशा**

ग्राहक व्यवहार विभागाने सुरू केलेल्या ई-जागृती या पोर्टलचा उद्देश आहे - तक्रारींचे निवारण अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि जलद करणे.

ऑनलाइन अर्ज : ग्राहक घरबसल्या तक्रार दाखल करू शकतो.

प्रकरणांची ट्रॅकिंग सुविधा : तक्रारीची स्थिती ऑनलाइन पाहता येते.

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुनावणी : दूरस्थ भागातील ग्राहकांना आयोगापर्यंत येण्याची गरज नाही.

डेटा व्यवस्थापन : आयोगांना प्रकरणे वर्गीकृत करून जलद निर्णय घेता येतो.

पारदर्शकता : सर्व प्रक्रिया ऑनलाइन असल्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो.

जर ई-जागृतीसारखे डिजिटल माध्यम प्रभावीपणे राबवले गेले, तर प्रकरणांच्या निवारणाचा वेग वाढेल. ग्राहकांचा वेळ व खर्च वाचेल. ग्राहक आयोगांवरील वाढता भार कमी होईल. ग्रामीण व शहरी ग्राहकांमध्ये न्यायप्राप्तीतील दरी कमी होईल. तसेच ग्राहकांचा ग्राहक न्यायालयांत वरील विश्वास वाढण्यास मदत होईल.

**पुढील वाटचाल**

डिजिटल न्याय ही केवळ तांत्रिक सुधारणा नाही तर ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची नवी दिशा आहे. मात्र यासाठी काही गोष्टी आवश्यक आहेत.

आयोगांमध्ये पुरेसे न्यायाधीश व कर्मचारी नेमणे. डिजिटल साक्षरतेसाठी फार मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवणे. ग्रामीण भागात ई-सेवा केंद्रांद्वारे मदत उपलब्ध करणे. तक्रारींच्या निवारणासाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करणे.

ई-जागृती हे डिजिटल माध्यम म्हणजे जादूची कांडी नव्हे. या माध्यमाद्वारे बऱ्याचशा गोष्टी सोप्या, सुलभ आणि जलद होऊ शकतील हे निश्चित. खर्चातही बऱ्यापैकी बचत होऊ शकेल. परंतु त्याशिवाय ग्राहक संरक्षण कायद्यात आणि ग्राहक न्यायालयांच्या कार्यप्रणालीत सुध्दा काही आमूलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे आग्रह प्रतिपादन मुंबई ग्राहक पंचायत, अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि ग्राहक पंचायत महाराष्ट्र या तीन संस्थांनी नुकतेच एका विचार मंथनाच्यावेळी केले आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे:

१) ग्राहक न्यायालयांच्या आर्थिक कार्यकक्षा आणि निकष बदलण्याची मागणी : ग्राहक न्यायालयातील जिल्हा, राज्य व राष्ट्रीय ग्राहक आयोगात तक्रार दाखल करताना ग्राहकाने संबंधित वस्तू व सेवा घेताना प्रत्यक्षात किती मोबदला मोजला हा आर्थिक निकष विचित्र परिस्थिती निर्माण करताना आढळतो, ज्यामुळे मोठ्या रकमांचे दावे जिल्हा आयोगाकडे तर छोट्या छोट्या रकमांचे दावे राष्ट्रीय आयोगाकडे जाताना दिसतात. तसेच अनेकदा वस्तू आणि सेवा याचा मोबदला देण्याआधीच तक्रार उद्भवू शकते, अशा तक्रारी या निकषामुळे ग्राहक न्यायालयात आता दाखलच होऊ शकत नाहीत. त्यामुळे हा निकष रद्द करून पूर्वीप्रमाणे तक्रारीचे एकूण मूल्य लक्षात घेऊन या आयोगांच्या आर्थिक कार्यकक्षा ठरवण्यात याव्या.

२) ग्राहक संरक्षण कायद्यातून विमा क्षेत्राला वगळण्याची मागणी : आज ग्राहक आयोगांतील २५ % तक्रारी या विमा क्षेत्रातील आहेत. यातील बहुतांश तक्रारी या व्यापारी कंपन्यांच्या असतात. हे विम्याचे दावे हे गुंतागुंतीचे असल्यामुळे अशा तक्रारींच्या सुनावणीला बराच वेळ लागतो. त्याचा परिणाम सर्वसामान्य ग्राहकांच्या इतर प्रलंबित तक्रारींवर होतो. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १(४) चा वापर करून व्यापारी कंपन्यांच्या विमा क्षेत्रातील तक्रारी ग्राहक कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात याव्यात आणि फक्त वैयक्तिक ग्राहकांच्या विम्याच्या तक्रारी अबाधित ठेवाव्या.

३) तक्रार निवारणासाठी कडक कालमर्यादा : ग्राहक न्यायालयातील कार्य पध्दती ठराविक कालमर्यादेत ठेवण्यासाठी तक्रार दाखल करून घेणे (१५ दिवस), विरुध्द बाजूचा जवाब दाखल करणे ३० + १५ दिवस), तक्रारदाराचा प्रतिजबाब दाखल करणे ( १५ दिवस) आणि दोन्ही बाजूंचे लेखी युक्तीवाद सादर करणे (सुनावणी पूर्वी २ दिवस) तसेच सुनावणीनंतर निकाल जाहीर करणे (१५ दिवस) या सर्व टप्प्यांना कंसात दर्शवल्याप्रमाणे कालमर्यादेचे कडक बंधन कायद्यातच अंतर्भूत करणे.

४) तक्रार-पूर्व मध्यस्थीची तरतूद : ग्राहक न्यायालयात येण्यापूर्वीच तक्रार-पूर्व मध्यस्थीद्वारे तक्रार निवारणाची कायदेशीर तरतूद ग्राहक संरक्षण कायद्यात केल्यास ग्राहक न्यायालयांवरील तक्रारीचा बोजा कमी होण्यास मदत होईल.

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने आपण ग्राहक आयोगांची सध्याची निराशाजनक स्थिती पाहिली. यामुळे ग्राहकांना न्याय मिळविणे कठीण झाले आहे. परंतु ई-जागृती सारख्या डिजिटल उपक्रमांमुळे कार्यक्षम व जलद निवारणाची आशा आता निर्माण झाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे केंद्र सरकारची याबाबत असलेली सकारात्मक इच्छाशक्ती. या इच्छा शक्तीच्या बळावरच ग्राहक आयोगांतील अध्यक्ष, सदस्यांची मानसिकता बदलणे, ग्राहक न्यायालयांची कार्यप्रणाली अत्यंत सोपी सुटसुटीत करणे शक्य होऊ शकेल. येत्या एक वर्षात ग्राहक न्यायालयांचे आंतर्बाह्य स्वरूप आमूलाग्र बदलण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायत अन्य ग्राहक पंचायतींच्या आणि ग्राहक संस्थांच्या सहकार्याने कटिबध्द असेल असा विश्वास या राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने मी समस्त ग्राहक वर्गाला देऊ इच्छितो.



## बदलते तंत्रज्ञान

# तुम्ही वापरत असलेला चार्जर फेक तर नाहीये ना?

मोबाइल हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनलाय. आजकाल आपण आपली अनेक कामं मोबाइलच्या माध्यमातून पूर्ण करतो. पण गेल्या काही काळापासून तुम्ही पाहिलं असेल, जेव्हा तुम्ही मोबाइल विकत घ्यायला जाता, तेव्हा काही कंपन्या आपल्या मोबाइलसोबत त्याचा चार्जर देत नाही. काही नामांकित कंपन्यांनी सुरू केलेली ही पद्धत आता एक ट्रेंड बनत चाललाय. आयफोन असो किंवा सॅमसंग, अनेक कंपन्या बॉक्समध्ये चार्जर देत नाहीत. यामुळे आपण फोन तर घेतो, पण चार्जर मात्र बाहेरून स्वस्तात विकत घेतो. मात्र, स्वस्त किंवा बनावट चार्जर वापरणं तुमच्या महागड्या फोनसाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते.




**बनावट चार्जरचे धोके**

ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर अनेक बनावट चार्जर्स उपलब्ध आहेत, जे दिसायला अगदी ओरिजिनल चार्जरसारखेच दिसतात. जर तुम्ही आयफोनचा चार्जर पाहिला, तर बनावट चार्जरही तसाच दिसेल, पण घरी आणून बारकाईनं पाहिल्यावर त्यावरील अक्षरांमध्ये तफावत म्हणजेच ते मिसमॅच असल्याचं दिसून येतं. असे चार्जर्सचा तुमच्या ७०-८० हजार रुपयांच्या फोनचं मोठं नुकसान करू शकतात. यामुळे फोनचं नुकसान होऊ शकते, बॅटरी खराब होऊ शकते आणि फोन जास्त गरम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**चार्जर ओरिजनल आहे का नाही कसा पहाल?**

तुम्ही घेतलेला चार्जर ओरिजनल आहे की नाही याबद्दल जर तुम्हाला शंका असेल तर तुम्ही स्वत: ते त पासून पाहू शकता. भारत सरकारच्या 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स'च्या (बीआयएस) वेबसाईटवर जाऊन तुम्ही चार्जरची सत्यता पडताळू शकता. प्रत्येक चार्जरवर एक 'आर' नंबर असतो. हा नंबर वेबसाईटवर टाकल्यावर त्याला सरकारनं मान्यता दिली आहे का नाही किंवा तो ड्युप्लिकेट आहे याबाबत माहिती मिळेल. जर तुम्ही थर्ड पार्टी चार्जर वापरत असाल तर, अशा प्रकारे तुमचा चार्जर तपासून पाहणं हे आवश्यक आहे. तुम्ही अशा प्रकारे तुमचा चार्जर ओरिजनल आहे की नाही हे पाहून, तुमच्या मोबाइलचं होणारं नुकसान टाळून काही रुपयांसाठी तुमच्या खिशावर येणारा भार टाळू शकता.

# प्रसिद्ध लेखक, शिक्षक साने गुरुजी



## निमित्त

पांडुरंग सदाशिव साने, म्हणून ओळखले जाणारे भावनिक, मराठी लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र, भारत येथील स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांना विद्यार्थी व अनुयायी साने गुरुजी म्हणून ओळखत त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली जवळील पालगड, या गावात झाला झाला.

वडील सदाशिवराव हे एक महसूल कलेक्टर होते, ज्यांना परंपरेने खोत असे संबोधले जात असे. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली तालुक्यातील पालगड या गावी झाले. पुढील शिक्षणासाठी मामाकडे पुण्यात पाठविण्यात आले, पण पुण्यात त्यांचे मन रमले नाही, परत ते दापोली येथील मिशनरी शाळेत राहण्यासाठी पालगडला आले. दापोली येथे असताना मराठी व संस्कृत या दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवणारे हुशार विद्यार्थी म्हणून त्यांना कवितेतही रस होता.


दापोली येथील शाळेत शिक्षण घेत असताना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावली. त्यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेणे परवडणारे नव्हते..साने यांनी कौटुंबिक आर्थिक मदतीसाठी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. तथापि त्यांच्या वडिलांनी पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना औंध संस्थेत दाखल केले. नंतर नूतन मराठी विद्यालयात विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला. सर्व संकटाना सामोरे जात त्यांनी त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावली.

१९१८ साली हायस्कूलमधून ते मॅट्रिक झाले. त्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी सर परशुरामभाऊ कॉलेजमधून पूर्ण केले. तेथे बीएची पदवी मिळवली. पुढे त्यांनी मराठी आणि संस्कृत साहित्यात एमएची मास्टर डिग्री पूर्ण केली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अंमळनेर येथील प्रताप हायस्कूल येथे शिक्षक म्हणून सहा वर्षे नोकरी केली. साने हे एक प्रतिभाशाली वक्ते होते आणि नागरी हक्क आणि न्याय यावर त्यांनी प्रभावी भाषण देऊन लोकांना आकर्षित केले. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वतः च्या उदाहरणातून स्वावलंबनाचे धडे दिले, सेवावृत्ती शिकवली. अंमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे त्यांनी तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला. सहा वर्ष नोकरी केल्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सामील होण्यासाठी शालेय नोकरीचा राजीनामा दिला. त्या वेळी १९३० साली महात्मा गांधींनी दांडी यात्रा चालू केली होती. नागरी अवज्ञा चळवळीत काम केल्याबद्दल ब्रिटिश अधीकार्यांनी त्यांना धुळे कारागृहात पंधरा महिन्यासाठी तुरूंगात टाकले होते.

१९३० ते १९४७ या कालावधीत साने गुरुजी वेगवेगळ्या आंदोलनात सहभागी झाले आणि आठ वेळा त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. साने गुरुजीं यांना त्रिचन्नापल्ली तुरुंगात डांबले गेले, तेव्हा त्यांनी तामिळ आणि बंगाली भाषा शिकली. त्यांनी त्यांचे बहुतांश लेखन हे तुरुंगात असतानाच केले. श्यामची आई ही सुप्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असतानाच लिहिली. सामाजिक-सांस्कृतिक मुक्तीचे साधन म्हणून त्यांनी ऑगस्ट १९४८मध्ये सुरू केलेले साधना साप्ताहिक त्यांचा संदेश देत आहे. त्यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल तिकीट जारी केले जाते. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

# पाळीत अतिवेदना, गर्भधारणेत अडचणी.. काय आहे आजार?

मासिक पाळीदरम्यान क्रॅम्प येणे किंवा असह्य वेदना होणे ही सामान्य गोष्ट मानली जाते. या कालावधीत निम्म्याहून अधिक महिलांना सुरुवातीच्या एक-दोन दिवसांमध्ये असह्य वेदना होतात. स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. जागृती वर्ष्णेय सांगतात, मासिक पाळीदरम्यान घट्ट झालेले एंडोमेट्रियम म्हणजेच गर्भाशयाचे अस्तर दूर जाते. हे काही हार्मोन्समुळे होते. जसे की, प्रोस्टॅग्लँडिन्स नावाचा घटक; जो गर्भाशयाचे आकुंचन, वेदना व जळजळ निर्माण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. या लक्षणांमुळे मासिक पाळीदरम्यान महिलांना क्रॅम्प्स येतात.



कधी कधी या वेदना गंभीर अजाराचे लक्षण असू शकतात. अजूनही अनेक जण एंडोमेट्रिओसिसकडे केवळ मासिक पाळीतील वेदना म्हणून पाहतात, परंतु सुरुवातीला किरकोळ वाटणाऱ्या या वेदनांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे रूपांतर एका गंभीर स्वरूपाच्या आजारात होऊ शकते. मासिक पाळीच्या काळात शरीराबाहेर टाकले जाणारे गर्भाशयाचे अस्तर म्हणजे एंडोमेट्रियम. अशा प्रकारचे अस्तर जेव्हा अंडाशयाभोवती आढळते, तेव्हा त्या स्थितीला 'एंडोमेट्रिऑसिस' म्हटले जाते.

एंडोमेट्रिओसिस हा आजार केवळ तुमच्या मासिक पाळीच्या चक्रात अडथळाच आणत नाही, तर तो शरीरातील अवयवांचे नुकसान करू शकतो, वंध्यत्वास कारणीभूत ठरू शकतो आणि मानसिक आरोग्यावरही परिणाम करू शकतो. अहमदाबाद येथील 'मेफ्लॉवर वूमेन्स हॉस्पिटल'चे एंडोमेट्रिओसिस तज्ज्ञ डॉ. स्मित पटेल यांनी सांगितले की, या आजाराचे लवकरात लवकर निदान आणि योग्य उपचार होणे गरजेचे आहे. काय आहे एंडोमेट्रिओसिस? त्याची लक्षणे आणि त्यावरील उपचार काय? जाणून घेऊयात

गर्भनिरोधक गोळ्यांसारखे हार्मोनल उपचार केवळ लक्षणे कमी करतात, पण तो कायमस्वरूपी उपाय नाही. डॉ. पटेल सावध करतानाच स्पष्ट करतात, हे उपचार केवळ लक्षणे कमी करतात. या औषधांच्या दीर्घकालीन वापरामुळे हाडे ठिसूळ होणे आणि मानसिक विकारांसारखे धोकेही उद्भवू शकतात. शस्त्रक्रियादेखील चुकीच्या पद्धतीने झाल्यास त्रास वाढू शकतो. तज्ज्ञांच्या मते, 'लॅप्रोस्कोपिक एक्सिजन' हीच यावरील सर्वोत्तम उपचारपद्धती आहे, परंतु जगभरातील फार कमी महिलांना असे योग्य उपचार मिळतात.

# महाडिकवाडीकरांना अंधश्रद्धा प्रबोधन

## नागरिकांची भीती दूर करण्यात पेण 'अंनिस' यशस्वी

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहराजवळील महाडिकवाडी गावात काही दिवसांपासून भूत, करणी, जादूटोणा याबाबत अफवा पसरवून गावात भीतीचे वातावरण निर्माण केले जात होते. जिवंत कोंबडा जमिनीत पुरणे, स्मशानभूमीत नारळ फोडणे, घरात मोठ्या आवाजात मंत्र-तंत्र करून दहशत पसरवणे अशा घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली होती.

याबाबत ग्रामस्थांनी पेण पोलीस स्टेशन तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (म.अंनिस), पेण यांच्याकडे तक्रार केली होती. म.अंनिस ने या प्रकरणाची ग्रामस्थांबरोबर शहानिशा करून उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्याशीही सविस्तर चर्चा केली व ज्यांच्यावर आरोप होते त्या कुटुंबाची भेट घेतली.



सर्व बाबींचा विचार करून गावात भूत, भानामती, करणी, जादूटोणा याबाबत चमत्कारा मागील विज्ञान याविषयी प्रात्यक्षिके व प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बुधवारी (दि.१७) महाडिकवाडी येथे व्याख्यान घेण्यात आले.

या व्याख्यानाचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, अशा प्रकारे करणी-जादूटोणा होत नसल्याची वैज्ञानिक व तर्कशुद्ध माहिती मिळाल्याने ग्रामस्थांच्या मनातील भीती पूर्णपणे दूर झाली असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक रसाळ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून नितीन निकम, प्राचार्य सतीश पोरे, जगदीश डंगर आणि संदेश गायकवाड उपस्थित होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

# 'प्रशासनाने नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने देशव्यापी सुशासन सप्ताह सुरु केला आहे. प्रशासन जनतेसाठी काय करते याची माहिती व्हावी, हा या सप्ताहाचा प्रमुख उद्देश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वसामान्य जनतेला सेवा सुविधा उपलब्ध करून देवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

सुशासन सप्ताहाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कार्यशाळा आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी रायगड एच.के.जावळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हाधिकारी रायगड एच.के. जावळे मार्गदर्शन करताना म्हणाले, केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा केंद्र शासनाचा स्तुत्य उपक्रम असून कामकाज करताना पारदर्शकता असली पाहिजे आणि कामकाज विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी वाड्या, वस्त्या असून शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत त्यांच्या असलेल्या समस्या संवाद सेतू या उपक्रमातून सोडविण्यावर भर द्यावा, असेही निर्देशही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. या उपक्रमात सार्वजनिक सेवेचे वितरण, तक्रार निवारण, पारदर्शकता या तीन महत्त्वाच्या बाबी आहेत. कायदा व व्यवहाराची सांगड घालून तसेच मानवी दृष्टीकोन व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून जनतेचे प्रश्न सोडवावेत. प्रशासकीय सेवा करताना आपण गोरगरीब जनतेची सेवा करतो त्याचे पुण्य आपल्याला नक्कीच मिळते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रवींद्र शेळके यांनी मानले. या कार्यशाळेवेळी प्रत्येक शासकीय विभागांनी मागील वर्षात जिल्ह्यात सुशासन उपक्रमांतर्गत राबविलेल्या योजनांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दाखविण्यात आली.

# मानिवली शाळेच्या नामकरणाबाबत सकारात्मक

## शिक्षणाधिकारी ललिता दहिफुले यांचे प्रतिपादन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचे जन्मगाव असलेला मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील नाव देण्याचा ठराव शालेय व्यवस्थापन समितीने केला आहे.

या ठरावाबाबत माणिवली शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षानी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. या शाळेच्या नामकरणाबाबत सकारात्मक निर्णय जाईल, असे आश्वासन जिल्हा शिक्षण अधिकारी ललिता दहिफुले यांनी व्यवस्थापन समितीला दिले आहे.

मानिवली या गावातील तरुण हिराजी गोमाजी पाटील यांनी देशासाठी हौतात्म्य प्राप्त केले आहे. त्यामुळे त्यांच्या गावातील जिल्हा परिषद शाळेला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील शाळा असे नाव देण्याबाबत ठराव शालेय व्यवस्थापन समितीने घेतला आहे. हा ठराव शालेय व्यवस्थापन समितीकडून कर्जत पंचायत समिती शिक्षण विभागाला देण्यात आला आहे. त्यात नवीन वर्षात २ जानेवारी रोजी हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांची ८३ वा बलिदान दिन साजरा होणार आहे. त्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती माणिवली शाळा आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी ललिता दहिफुले यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली.

शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष जितेंद्र गवळी आणि शिक्षण विभागाचे केंद्र प्रमुख नारायण सोनावणे तसेच आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे हे उपस्थित होते. या विषयी आपण लवकरच सकारात्मक निर्णय घेऊ असे आश्वासन जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी ललिता दहिफुले यांनी दिले आहे.

# सीएफआयतर्फे विद्यार्थ्यांसाठी संगीत-प्रेरणात्मक कार्यक्रम





**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया (सीएफआय) या संस्थेच्या वतीने १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने एक प्रेरणादायी व संगीत-आधारित मोटिवेशनल कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात यशस्वीरित्या पार पडला. हा कार्यक्रम संस्थेचे सीईओ डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. संतोष बोराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्यासोबत गिटारवादक प्रितेश चौधरी आणि तबलावादक नरेंद्र भोईर यांच्या प्रभावी संगीत टीमने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची दिली. संगीताच्या माध्यमातून अभ्यासाचा ताण कमी करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करणे याबाबत विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या व परिणामकारक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. संगीताच्या लयीमधून संवाद कौशल्ये विकसित करणे, स्वतःची क्षमता ओळखणे आणि एकाग्रता वाढवण्याची तंत्रे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगण्यात आली.

डॉ. संतोष बोराडे यांनी आपल्या जीवनातील वास्तव अनुभव, प्रेरणादायी कथा आणि विचारप्रवर्तक उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची नवी दिशा दिली. देशातील नामवंत क्रिकेटपटू, प्रशासकीय अधिकारी आणि कलाकारांना त्यांनी दिलेल्या प्रेरणेची उदाहरणे मांडताना एम. एस. धोनी यांचे विशेष उदाहरण देत, योग्य प्रेरणा, मानसिक बळ आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावरच भारताने २०११ चा क्रिकेट विश्वचषक जिंकला, हे प्रभावीपणे स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना प्रभावीपणे व्यक्त करण्याची तंत्रे शिकवण्यात आली. त्यामुळे कार्यक्रमानंतर अनेक विद्यार्थी स्वतःहून पुढे येऊन आपले अनुभव मांडू लागले. या कार्यक्रमामुळे आमच्यात कमी वेळात मोठा सकारात्मक बदल झाला, मी हे करू शकतो, अभ्यासासाठी नवी ऊर्जा व उत्साह मिळाला अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या अनोख्या संगीत-प्रेरणात्मक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, एकाग्रता आणि सकारात्मक दृष्टिकोन लक्षणीयरीत्या वाढीस लागला असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारा ठरल्याची भावना उपस्थित सर्वांनी व्यक्त केली. या वेळी मान्यवरांनीही आनंद घेतला.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीसपदी नईम हर्णेकर



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथील नईम अ.कादिर हर्णेकर यांची रायगड जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी यांनी करून आपल्या सहीनिशी असलेले नियुक्तीपत्र नईम हर्णेकर यांना खासदार सुनील तटकरे व महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांच्या हस्ते शनिवारी (दि.२०) मोर्बा येथे घेण्यात आलेल्या ज्येष्ठ नेते अस्लम राऊत व समर्थकांच्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात देण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नईम हर्णेकर यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या विकासात भरीव कामगिरी हर्णेकर हे करतील व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिप्रेत असलेली पक्ष संघटना मजबुतीने उभी करून हर्णेकर हे आपली पक्षाच्या जिल्हा सरचिटणीसपदी केलेली नियुक्ती सार्थ ठरवतील, असा विश्वास पक्ष श्रेष्ठींनी व्यक्त करीत त्यांची हि नियुक्ती केली आहे.

# पोस्को कंपनीची सामाजिक बांधिलकी : मुक्तक जोशींचे शाश्वत शेतीवर मार्गदर्शन

**माणगाव : बातमीदार**

विळेभागाड औद्योगिक वसाहत, ता. माणगांव, जि. रायगड येथील नामांकित पोस्को महाराष्ट्र स्टील मल्टीनॅशनल कंपनीत तालुक्यातील स्थानिक शेतकरी व पत्रकारांसाठी आयोजित एकत्रित त्रैमासिक चर्चासत्र उत्साहात झाले. कंपनीच्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांचा आढावा, शाश्वत शेतीकडे वाटचाल, मातीचे आरोग्य आणि एकात्मिक शेती या विषयांवर संभाजीनगर येथील प्रेरणादायी वक्ते मुक्तक जोशी यांनी मार्गदर्शन केले.

या चर्चासत्रास तालुक्यातील १०७ शेतकरी बांधव-भगिनी, १७ पत्रकार तसेच पंचायत समिती कृषी विभागातील तीन अधिकारी असे एकूण १२७ जण उपस्थित होते. आयटी उद्योजक म्हणून यशस्वी कारकीर्द गाजवून, अनेक अपयशांवर मात करत सेंद्रिय शेतीत यश मिळवणारे मुक्तक जोशी हे उच्चशिक्षित शेतकरी म्हणून उपस्थितांसाठी




प्रेरणास्थान ठरले.

संभाजीनगर येथे ऑर्गॅनिक फार्म चालवून जोशी १०० टक्के नैसर्गिक फळे व भाजीपाला उत्पादन करतात. मोठ्या पॅकेजच्या नोकरीच्या आणि परदेशात स्थायिक होण्याच्या स्वप्नांपेक्षा शेतीत राबून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळवून देण्याला त्यांनी प्राधान्य दिले आहे. प्रत्यक्ष शेतात काम करून संशोधनाच्या आधारे मार्गदर्शन करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी आपल्या व्याख्यानात नमूद केले.

# कडधान्याची लागवड सुरू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरात शेतकरीराजाने शेती कापल्यावर आपल्या शेतात कडधान्य लागवडीला सुरुवात केली आहे. वाल, मुग, हरभरे, मटकी, भूईमुगाच्या शेंगा व चवळी याबरोबर भाजीपाल्याचेदेखील पीक घेत आहे.

उदरनिर्वाह शेती व्यवसायावर असल्याने कापणीनंतर कडधान्याचे पीक घेत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या हंगामात थंडीच्या दवामुळे जमीन ओलसर झाल्याने कडधान्यांना पोषक द्रव्य जमिनीतून मिळते. यात वाल, तूर, चणा या पिकांना जास्त पाण्याची आवश्यकता नसल्याने रात्रीच्या दवावर यांची वाढ होते या हंगामात हे पीक घेत असल्याने का लोकांना रोजगार मिळतो. शेतीला जोड धंदा म्हणून ही कडधान्याची पिके घेतली जात असल्याचे शेतकऱ्याने सांगितले.

# प्रशांत वाघमारे यांचा अनेक कार्यकर्त्यांसह रिपाइंत जाहीर प्रवेश

**पाली : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले तसेच आंबेडकरी बहुजन चळवळीतील एक लढाऊ व अभ्यासू नेतृत्व तथा ऑल इंडिया पँथर सेनेचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत वाघमारे (पाली विडसई) यांनी आपल्या असंख्य समर्थक कार्यकर्त्यांसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल भाई सोनावळे यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात रिपाइं चे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या कुशल नेतृत्वावर प्रभावित होऊन तसेच सुधागड रायगडचे डॅशिंग नेतृत्व राहुलभाई सोनावळे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून प्रशांत वाघमारे यांनी व विडसई गावच्या अनेक ग्रामस्थांनी रिपाइं चा झेंडा हाती घेत आंबेडकरी बहुजन चळवळीला अधिक बलाढ्य व सामर्थ्यवान बनविण्याचा निर्धार केला.

रिपाइं पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनीही प्रवेश कर्त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रशांत भाई वाघमारे यांच्या समवेत महादेव वाघमारे, विलास वाघमारे, पांडुरंग वाघमारे, गजानन वाघमारे, महेश वाघमारे,माधुरी वाघमारे, दामिनी वाघमारे, विशाखा वाघमारे, दीपाली वाघमारे, विजय वाघमारे, वैशाली वाघमारे, प्रणाली वाघमारे, अशोक वाघमारे, गणेश वाघमारे,पूर्वा वाघमारे, रुपाली वाघमारे, अनंत वाघमारे, नरेश वाघमारे, सचिन मारुती वाघमारे, रामदास वाघमारे आदिसह विडसई गावच्या असंख्य ग्रामस्थांनी पक्ष प्रवेश केला.

या पक्ष प्रवेश कार्यक्रमास रिपाइंचे कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, सातारा जिल्हाध्यक्ष अशोक (बापू)गायकवाड, कोकण नेते रवींद्रनाथ ओव्हाळ, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुलभाई सोनावळे, कोकणचे युवा नेते सुशांत सकपाळ, अमित कांबळे,भगवान शिंदे, हिरामण गायकवाड, सुनिल सप्रे, अमित गायकवाड, मोहनिष गायकवाड आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोर्बे, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. अनंत महादु शेळके, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे मोर्बे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ६९/४ | १ | ०-४५-८० | ०-०४-०० | ०-४९-८० | ८.६२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/१२/२०२५

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालीका कॉम्प्लेक्स, तहसिलदार ऑफिस जवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. संपर्क:- ८८८८२७१७५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही त्यापुढे नमूद व्यक्तींच्या मालकी हक्काची मिळकत आहे.

**मौजे - अजिवली, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ८२ | ०-२६-५०<br>पो.ख. ०-०२-३०<br>**एकूण ०-२८-८०**<br>**पैकी ०-२७-८०** | ५.२३ | वसंता कानू सार्डेकर<br>अनंता कानू सार्डेकर<br>रुख्मीणी पांडूरंग शेलके<br>राधा बाळू पाटील<br>जनाबाई कानू सार्डेकर<br>सत्यभामा पांडूरंग सार्डेकर<br>एकनाथ पांडूरंग सार्डेकर<br>जगन्नाथ पांडूरंग सार्डेकर<br>पद्माकर पांडूरंग सार्डेकर<br>जनार्दन पांडूरंग सार्डेकर<br>जगदिश पांडूरंग सार्डेकर |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २३/१२/२०२५.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१

# नवी मुंबई शहरात वाढते प्रदूषण

## महापालिका निवडणुकीत मुद्दा केंद्रस्थानी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वेगाने विस्तारत असलेले नागरीकरण, वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली बांधकामे आणि औद्योगिक क्षेत्रातून उत्सर्जित होणारे रासायनिक वायू यामुळे नवी मुंबई शहरातील प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे सामान्य नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली असून, प्रदूषण नियंत्रणासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणाऱ्या उमेदवारालाच निवडून देण्याचे आवाहन पर्यावरणवाद्यांकडून केले जात आहे.

शहरातील वाशी, नेरूळ, सानपाडा, घणसोली, कोपरखैरणे, खारघर आणि तळोजा परिसरात सुरू असलेल्या बांधकामांमुळे धूळप्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. रस्त्यांवरून उडणारी धूळ, बांधकाम साहित्याची वाहतूक आणि अपुऱ्या संरक्षण उपाययोजनांमुळे हवेची गुणवत्ता खालावत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार केल्या जात आहेत. त्याचबरोबर वाहनांची संख्या वाढल्याने धूरप्रदूषण आणि वाहतूक कोंडीही गंभीर स्वरूप धारण करत आहे.



औद्योगिक परिसरातील रासायनिक वायूंचे उत्सर्जन, शहरात आणि शहराबाहेरील कचराभूमीत कचरा जाळण्याच्या घटना आणि वाढते ध्वनीप्रदूषण यामुळे अनेक भागांत नागरिकांच्या राहणीमानावर परिणाम होत आहे. यामुळे श्वसनविकार, डोळ्यांचे आजार, त्वचारोग यांसारख्या समस्यांमध्ये वाढ झाल्याचे स्थानिक रहिवासी सांगत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजार असलेल्यांना याचा अधिक फटका बसत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून या अवैधरित्या रासायनिक वायू उत्सर्जित करणाऱ्या कंपन्यांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्याशिवाय नवी मुंबई मनपा प्रशासनाकडूनही मंडळाला वारंवार पत्रव्यवहार करूनही मंडळाकडून औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणनियंत्रणासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याने प्रशासनाकडूनही मंडळाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने प्रदूषण नियंत्रणासाठी विविध उपाययोजना राबवल्या असल्या, तरी त्या पुरेशा नाहीत, अशी भावना नागरिकांमध्ये आहे. महापालिका प्रशासनाने आतापर्यंत ८६ बांधकाम साईट्सना प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस बजावली आहे. तर १८ विकासकांच्या बांधकाम प्रकल्पनांवर स्थगितीची कारवाई केली आहे.

> *गेल्या काही वर्षांपासून शहरातील प्रदूषणाचा मुद्दा गंभीर बनला आहे. मागील पाच वर्षांपासून महापालिका निवडणुका न झाल्याने लोकप्रतिनिधींना याबाबत जाब विचारता आला नाही, मात्र आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराचे भवितव्य लक्षात घेता, जे उमेदवार पर्यावरण आणि प्रदूषण नियंत्रणाच्या मुद्द्याला प्राधान्य देतील त्यांनाच मतदान करावे, असे आवाहन नागरी संघटनांकडून मतदारांना करण्यात येत आहे.*
>
> **–संकेत डोके,** *अध्यक्ष, नवी मुंबई विकास अधिष्ठान*

त्याशिवाय अत्याधुनिक तंत्रज्ञान व मनुष्यबळाच्या साहाय्याने शहरातील मुख्य रस्ते व विभागात निर्माण होणाऱ्या धुळीवर यंत्रणासाठी दिवसातील दोन सत्रात सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्या आहेत, मात्र शहरातील वाढता विकास पाहता दीर्घकालीन आणि प्रभावी धोरणांची गरज असल्याचे पर्यावरणतज्ज्ञांचे मत आहे. हिरवळीचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करणे, सायकल व पादचारी मार्गांना प्रोत्साहन देणे आणि प्रदूषण नियंत्रण नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे, अशा अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी गट आणि युवक व नागरी संघटनांनी स्वच्छ हवा आणि शाश्वत विकासाचा मुद्दा निवडणूक प्रचारात ठळकपणे मांडण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांकडून केवळ आश्वासनांपेक्षा ठोस कृतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सुनियोजित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात नागरिकांना निरोगी वातावरणासाठी 'स्वच्छ हवा आणि पर्यावरण' मिळायलाच हवे. असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. एकंदरित, नवी मुंबईतील प्रदूषणाचा प्रश्न हा केवळ पर्यावरणाचा नसून सार्वजनिक आरोग्य आणि शहराच्या भविष्यासाठी महत्त्वाचा असल्याने, येत्या महापालिका निवडणुकीत मतदारांचा कौल ठरवताना हा मुद्दा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. हवा, ध्वनी आणि पर्यावरणीय प्रदूषण यांचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, येत्या महापालिका निवडणुकीत हा मुद्दा केंद्रस्थानी येताना दिसत आहे.

# डॉलर देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणारे दोघे जेरबंद

## एपीएमसी पोलिसांची कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वस्तात डॉलर देण्याचे आमिष दाखवून दोन संशयित आरोपींनी नवी मुंबईतील तुर्भे भागात एका व्यक्तीची फसवणूक केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी तपासचक्र फिरवून दोन आरोपींना अटक केली आहे. या संशयित आरोपींनी या पूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुफजुल हक हसुमुद्दीन शेख, (वय ४०) आणि सहीद बारीक शेख (वय ३२) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे असून दोघेही तुर्भे भागात राहत असून मूळ झाडखंड राज्यातील आहेत. १९ तारखेला एका व्यक्तीला स्वस्तात डॉलर देण्याचे आमिष दाखवून या दोघांनी त्यांच्याकडून तीन लाखांची रक्कम घेत त्यांना डॉलर दिले, मात्र काही वेळाने फिर्यादी यांनी आरोपींनी दिलेले पुडके उघडून पहिले असता त्यात नोटच्या आकाराचे कागद आढळून आले. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

गुन्हा दाखल होताच सीसीटीव्ही पाहणी करणे प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करणे आदी तपास सुरू असतनाला संशयित आरोपी तुर्भे जनता मार्केट भागात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे २२ तारखेला त्यांना सापळा रचून अटक करण्यात आली. संशयित आरोपींच्या कडून ५० हजार रुपयांची रोकड,



युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका यांच्या कडील दोन डॉलरच्या नोटा प्रत्येकी २० डॉलर किमतीच्या, निळ्या रंगाची पिशवी त्यात आकाशी रंगाचा रुमाल व डॉलरच्या नोटांच्या आकाराचे घडी करून ठेवलेले वेगवेगळे वृत्तपत्र आढळून आला. पोलिसांनी सर्व ऐवज जप्त केला आहे.

आरोपी हे एखाद्या व्यक्तीला हेरून स्वस्तात अमेरिकन डॉलर देण्याचे आमिष दाखवतात. सुरुवातीला एक दोन डॉलरच्या एक दोन नोटा दाखवून त्याचा विश्वास संपादन करतात. नंतर ठरविक ठिकाणी भेट ठरवली जाते. या उभ्या उभ्या होणाऱ्या भेटीला फिर्यादी यांच्या कडून पैसे घेत असताना त्यांना नोटांच्या आकाराचे पुडके एखाद्या पिशवीत देतात. आणि अचानक पोलीस मागावर असल्याचे सांगत पळून जातात.

यात फिर्यादीची वाट मिळेल तिकडे पळून जातात. काही वेळाने जेव्हा पिशवी उघडून फिर्यादी पाहणी करतो त्यावेळी नोटांच्या आकाराचे कागदाचे पुडके असल्याचे कळते मात्र तो पर्यंत फसवणूक करणारे पळून गेलेले असतात. दरम्यान, अशा घटना वारंवार घडत आहेत.

# ऐरोलीतील इमारतीवर सिडकोची कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या अधिसूचित जागांवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा बडगा उगारत सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने सोमवारी ऐरोली नोडमध्ये मोठी निष्कासन मोहीम राबवली. सेक्टर २०, ऐरोली येथील सर्व्हे नंबर ७ व ४४ मधील सिडकोच्या जागेवर उभारण्यात आलेली आरसीसी पद्धतीने बांधलेली सहा मजली अनधिकृत इमारतीचा भाग पाडण्यात आला.

सदर बांधकामाचे अंदाजे क्षेत्रफळ ३१७ चौरस मीटर असून या इमारतीतील एकूण १६ स्लॅब, तसेच पाचव्या व सहाव्या मजल्यावरील बांधकाम ब्रेकरच्या साहाय्याने पाडण्यात आले. हे बांधकाम सिडको महामंडळाच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून, तसेच कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आल्याचे स्पष्ट झाल्याने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

ही मोहीम सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार सिडकोचे अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागाचे मुख्य नियंत्रक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईदरम्यान सिडको ऐरोली अतिक्रमण विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी, सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या निष्कासन मोहिमेसाठी आठ ब्रेकर, १२ कामगार, दोन जीप, एक टेम्पो ट्रॅव्हलर आणि एक रुग्णवाहिका तैनात करण्यात आली होती.

# नवी मुंबईत महापालिका निवडणूक प्रक्रियेला वेग

## सुरक्षा कारणास्तव कोपरखैरणे, घणसोली नो पार्किंग झोन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मनपा निवडणुकीनिमित्त पार पडणाऱ्या विविध प्रक्रियांसाठी घणसोली आणि कोपरखैरणे या ठिकाणी नो पार्किंग झोन जाहीर करण्यात आले आहे. २३ डिसेंबर ते १७ जानेवारीदरम्यान ही अधिसूचना वाहतूक विभागाने काढली आहे.

नवी मुंबई महानगर पालिकेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १५ तारखेला निवडणूक तर १६ तारखेला मतमोजणी करण्यात येणार आहे. या अनुशंघाने शहरातील काही ठिकाणी मतदान प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहे. त्यावेळी पोलीस , मनपा कर्मचारी आणि निवडणूक संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या गाड्यांची रेलचेल असणार आहे. त्यामुळे सुरक्षा कारणास्तव ही प्रक्रिया ज्या



ठिकाणी सूर आहे त्या ठिकाणी नो पार्किंग झोन वाहतुक पोलीस विभागाने जाहीर केले आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला आहे. ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून १८ डिसेंबर ते १९ जानेवारी दरम्यान प्रक्रिया पूर्ण होणार आहे. कोपरखैरणे विभागातील प्रभाग क्रमांक १०, ११, १२, १३ या प्रभागातील निवडणुकीचे सर्व प्रक्रिया जसे नामनिर्देशन फॉर्म वाटप करणे, स्विकारणे, मतपेटी वाटप, स्ट्रॉंग रूम, मतमोजणी इ. प्रक्रिया अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर ५, कोपरखैरणे येथे पार पडणार आहे. या सभागृहा कडे ये जा करण्यासाठी तीन टाकी चौक ते हनुमान मंदिर चौक असा रस्ता आहे. या मार्गावर सध्या सम विषम पार्किंग व्यवस्था आहे.नवी मुंबई महानगरपालिका निवडणुक दरम्यान २३ डिसेंबर ते १७ जानेवारी दरम्यान कोपरखैरणे वाहतूक शाखेच्या हद्दीत तीन टाकी चौक ते हनुमान मंदिर चौक पर्यंत नो पार्किंग झोन घोषित करण्यात आला आहे.

### नियमावली जारी

या शिवाय घणसोली विभागातील प्रभाग क्रमांक ६, ८ व ९ या प्रभागातील निवडणुकीचे सर्व प्रक्रिया नामनिर्देशन फॉर्म वाटप करणे, स्विकारणे, मतपेटी वाटप, स्ट्रॉंग रूम, मतमोजणी आदी प्रक्रिया घणसोली सेक्टर ७ येथील समाज मंदिर हॉल, येथे पार पडणार आहे. या सभागृहाकडे जाणे येण्यासाठी घणसोली मुख्य रस्ता हरी कॉम्प्लेक्स, सेक्टर ७ पासून नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ७६ समोरील चौक असा रस्ता आहे. या रस्त्यावर वाहने पार्क झाल्यास वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने २३ डिसेंबर ते १७ जानेवारी दरम्यान हा रस्ता नो पार्किंग झोन जाहीर करण्यात आला आहे.

# दिघोडे येथे पारंपारिक कोळी समाज मच्छीमार संस्थेची स्थापना

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण तालुक्यातील दिघोडे कोळीवाडा येथे रविवारी (दि.२१) पारंपारिक कोळी समाज मच्छिमार वि. का. स. संस्था मर्यादित, दिघोडे या सहकारी संस्थेचा उद्घाटन समारंभ मोठया उत्साहात पार पडला.

गोर गरीब कोळी बांधवांचे प्रश्नी मार्गी लागावे व शासनाच्या अनेक सुविधांचा लाभ कोळी बांधवांना मिळावा या उद्देशाने या संस्थेची स्थापना केल्याचे संस्थेचे चेअरमन अशोक कोळी आणि



सेक्रेटरी प्रितेश कोळी यांनी सांगितले. स्वर्गीय केशव बुधाजी नाखवा सभागृहात पार पडलेल्या या भव्य कार्यक्रमासाठी उद्घाटक व मार्गदर्शक रमेश भास्कर कोळी, सीताराम जनार्दन नाखवा, महेंद्र हरिश्चंद्र चोगले आदी उपस्थित होते.

मार्गदर्शकांनी कोळी समाजाचा इतिहास व सद्य परिस्थिती यावर मार्गदर्शन करत उपस्थित कोळी बांधवांना संबोधित केले. या कार्यक्रमासाठी अनेक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मोहाकोळीवाडा सोसायटीचे चेअरमन गोविंद कोळी, गव्हाण सोसायटीचे चेअरमन हितेश कोळी, मोठीजुई सोसायटीचे चेअरमन माणिक कोळी तसेच आयोजक, संस्थेचे खजिनदार राजाराम कोळी, सदस्य तुकाराम नाखवा, हरिश्चंद्र नाखवा, हिराजी नाखवा, जयश्री नाखवा, धनवंती कोळी, रेश्मा कोळी, विजय कोळी, हरेश कोळी, तसेच दिघोडे गावातील नागरिक, डि डि कोळी, के.डी कोळी, दत्ता कोळी आणि इतर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविकपर मनोगत प्रितेश काशीनाथ कोळी यांनी केले तर समारोप संस्थेचे चेअरमन अशोक जनार्दन कोळी यांनी मान्यवरांचे आभारपर मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाची समाप्ती केली.

# मोहोपाडा आंबिवलीतून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



मोहोपाडा आळी आंबिवली येथून श्रेयश पांडुरंग पिंगळे (वय १५ वर्ष ९ महिने) हा अल्पवयीन आहे हे माहित असूनसुद्धा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यास फुस लावून पळवून नेल्याची तक्रार रसायनी पोलिस ठाण्यात त्याचे वडील पांडूरंग जगन्नाथ पिंगळे यांनी केली आहे.

श्रेयशचा आजुबाजुला नातेवाईक, मित्र मैत्रिणी व गावात शोध घेतला असताही श्रेयसचा थांगपत्ता लागला नाही.तो अंगाने सडपातळ, रंग सावळा, उंची पाच फुट, चेहरा गोल, नाक पसरट, अंगात लांब बाहिचा चौकटीचा गुलाबी व फिकट राखाडी रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची लांब पॅट, पायात निळ्या रंगाची चप्पल, मराठी भाषा बोलतो.

याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम १३७(२) याप्रमाणे गुन्हा दाखल झाला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे अधिक तपास करीत आहेत.

# रिटघर येथे इंग्रजी विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या अग्रगण्य गनणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांपैकी एक असलेल्या श्री.भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे मंगळवारी (दि.२३) इयत्ता बारावीच्या कला व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयावर मार्गदर्शनात्मक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी प्राचार्य आर. बी. कारंडे यांनी मनोगतात विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक उपक्रमांचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून नियोजनबद्ध पद्धतीने तयारी केल्यास यश निश्चितच मिळते, असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर प्रा. अजने सर यांनी कार्यशाळेचे मार्गदर्शक डॉ. सूर्यकांत परकाळे, इंग्रजी विभाग सीकेटी महाविद्यालय खांदा कॉलनी यांची



उपस्थितांना थोडक्यात ओळख करून दिली.

यानंतर डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी इंग्रजी विषयाच्या बारावीच्या बोर्ड परीक्षेचा पेपर कशा पद्धतीने सोडवावा याबाबत सविस्तर व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सराव प्रश्नपत्रिकांचा नियमित अभ्यास, लिखाणाचा सातत्यपूर्ण सराव, वेळेचे योग्य नियोजन तसेच सकारात्मक दृष्टिकोन या बाबींवर विशेष भर दिला. परीक्षेची भीती न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मार्गदर्शनादरम्यान त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करत, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली ही संस्था ग्रामीण व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे, असे नमूद केले. तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, लोकनेते मा. रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या प्रगतीचा आलेख उंचावावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंका व प्रश्नांचे सविस्तर निरसन करण्यात आले.

कार्यशाळेसाठी प्रा. अजने, प्रा. भोईर मॅडम, शिंदे मॅडम, पाटील, म्हात्रे तसेच इतर शिक्षकवृंद यांनी मोलाचे सहकार्य केले. समारोपवेळी प्रा. जाडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नवी मुंबई मनपास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन कोरल बेल्स इंटरनॅशनल स्कूल, ऐरोली येथे मोठ्या दिमाखदार सोहळ्यात झाले.

यावर्षी एनसीईआरटी नवी दिल्ली यांच्या दिशा निर्देशान्वे विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एसटीईएम असा निश्चित करून देण्यात आला होता. त्यानुसार नवी मुंबईतील इयत्ता सहावी ते आठवी व इयत्ता नववी ते बारावी अशा गटातून एकूण ४७ शाळांनी सहभाग घेतला. प्रदर्शनाचे वैशिष्ट्य अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्यांची



सुद्धा शिक्षकांनी मांडणी करून सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि संशोधन वृत्तीला चालना देणे या गोष्टी या प्रदर्शनामधून दिसून आल्या.

प्रदर्शनाचे उद्घाटन सन्मा. उपायुक्त संघरत्ना खिल्लारे व सहाय्यक आयुक्त डॉ. दिपाली दिवेकर यांच्या हस्ते झाले. उपायुक्त मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांची पाहणी करून भरभरून कौतुक केले व सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी सहा परीक्षकांची नेमणूक करण्यात आली सर्व परीक्षकांनी अत्यंत विचारपूर्वक आणि पारदर्शक रित्या परीक्षण करून प्रत्येक गटातून प्रथम क्रमांकाची निवड केली.

शिक्षण अधिकारी अशोक कडूस साहेब यांनी विजयी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रकांची फोटो फ्रेम देऊन सन्मानित केले. सदर प्रदर्शनासाठी जवळील शाळेतील विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व केंद्रप्रमुख यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत केली.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाची संपूर्ण जबाबदारी केंद्रप्रमुख सुरेखा पायरे यांनी ऐरोली गटातील शिक्षकांच्या उत्तम सहकार्याने पूर्णत्वास नेली. विशेष योगदान कोरल बेल्स इंटरनॅशनल स्कूल, आर्य गुरुकुल जुनियर कॉलेज व जयहिंद विद्यालय ऐरोली यांचे राहिले.

# आजपासून विजय हजारे ट्रॉफीचा थरार

## बीसीसीआयच्या नियमामुळे स्टार क्रिकेटपटूही मैदानात

**मुंबई : प्रतिनिधी**

विजय हजारे क्रिकेट स्पर्धेचा थरार बुधवार (दि. २४)पासून सुरू होत आहे. देशांतर्गत महत्त्वाच्या क्रिकेट स्पर्धांमध्ये विजय हजारे ट्रॉफीचा समावेश होतो. ही स्पर्धा १९९३-९४पासून खेळवली जात आहे. बीसीसीआयने केलेल्या नियमानुसार आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या भारतीय क्रिकेटपटूंनाही दरवर्षी ठराविक देशांतर्गत सामन्यांमध्ये खेळण्याचे बंधन आहे. या नियमामुळे रोहित शर्मा, विराट कोहली आदी दिग्गज क्रिकेटपटूही विजय हजारे ट्रॉफीचे सामने खेळताना दिसतील.



विजय हजारे ट्रॉफी २४ डिसेंबरपासून सुरू होत असून गट फेरीचे सामने ८ जानेवारीपर्यंत खेळवले जाणार आहेत. त्यानंतर १२ जानेवारीपासून नॉकआउट फेरीला (बाद फेरी) सुरुवात होईल. स्पर्धेचा अंतिम सामना १८ जानेवारी रोजी होणार आहे. चाहत्यांना आता विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना पुन्हा देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळताना पाहण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेत विराट आणि रोहित यांच्यासह ऋषभ पंत, शुबमन गिल, केएल राहुल, हार्दिक पंड्या, अर्शदीप सिंग आणि अभिषेक शर्मा यांसारखे अनेक स्टार खेळाडू सहभागी होणार आहेत. सर्वांचे लक्ष प्रामुख्याने विराट कोहली आणि रोहित शर्मावर असणार आहे. बीसीसीआयने केंद्रीय करार असलेल्या खेळाडूंना किमान दोन विजय हजारे सामन्यांत खेळणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे हे सर्व दिग्गज खेळाडू मैदानात उतरतील हे निश्चित झाले आहे.

विराट कोहली तब्बल १५ वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफीत पुनरागमन करत आहे. स्पर्धेआधी त्याने माजी भारतीय फलंदाजी प्रशिक्षक संजय बांगर यांच्यासोबत विशेष सराव केला. मुंबईत कसून मेहनत घेतल्यानंतर विराट दिल्ली संघाच्या सामन्यांसाठी बंगळुरू येथे पोहचला आहे. दुसरीकडे रोहित शर्मा २४ आणि २६ डिसेंबर रोजी जयपूरमध्ये सिक्कीम आणि उत्तराखंडविरुद्ध मुंबई संघाकडून खेळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दिल्लीचे सुरुवातीचे सामने बंगळुरूमध्ये आंध्र प्रदेश आणि गुजरातविरुद्ध होणार आहेत, मात्र चाहत्यांसाठी सर्वात मोठा झटका म्हणजे, ज्या सीओई स्टेडियममध्ये हे सामने खेळवले जाणार आहेत, तिथे प्रेक्षकांना प्रवेश दिला जाणार नाही.

### अशी आहे गटवारी

- **गट अ :** केरळ, झारखंड, राजस्थान, मध्य प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, पुडुचेरी, त्रिपुरा
- **गट ब :** विदर्भ, हैदराबाद, बंगाल, बडोदा, आसाम, उत्तर प्रदेश, चंदीगड, जम्मू आणि काश्मीर.
- **गट क :** छत्तीसगड, महाराष्ट्र, गोवा, हिमाचल प्रदेश, पंजाब, मुंबई, उत्तराखंड, सिक्कीम.
- **गट ड :** रेल्वे, आंध्र, हरियाणा, गुजरात, सौराष्ट्र, दिल्ली, सेवा, ओडिशा.

यंदाच्या विजय हजारे ट्रॉफीत एलिट आणि प्लेट विभागात मिळून एकूण ३८ संघ सहभागी होत आहेत. एलिट गटात ३२ संघ असून त्यांचे प्रत्येकी आठ संघांच्या चार गटांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. प्रत्येक संघ आपल्या गटातील इतर संघांविरुद्ध एक सामना खेळेल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील, त्यानंतर उपांत्य फेरी आणि अंतिम सामना खेळवला जाईल. प्लेट गटात सहा संघांचा समावेश आहे.

गट फेरीचे सामने अहमदाबाद, बंगळुरू, अलूर, जयपूर आणि राजकोट येथील विविध मैदानांवर होणार आहेत. सर्व सामने सकाळी ९ वाजता सुरू होतील. थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर व जिओ हॉटस्टार ॲपवर लाईव्ह स्ट्रीमिंग उपलब्ध असेल.

# अविश्वसनीय! एकाच षटकात पाच विकेट्स

## इंडोनेशियाच्या गेडे प्रियंदानाने रचला इतिहास

**जकार्ता : वृत्तसंस्था**

क्रिकेट या खेळात प्रत्येक चेंडूगणिक नवा विक्रम घडू शकतो, या वाक्याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. इंडोनेशियाचा २८ वर्षीय वेगवान गोलंदाज गेडे प्रियंदाना याने कंबोडियाविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात एकाच षटकात पाच बळी घेतले असून अशी कामगिरी करणारा प्रियंदाना हा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे.

इंडोनेशियाविरुद्ध १६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कंबोडियाचा संघ १५ षटकांत ५ बाद १०६ धावांवर होता. सामना दोन्ही संघ जिंकतील अशा स्थितीत होता. इंडोनेशियाच्या कर्णधाराने वेगवान गोलंदाज गेडे प्रियंदानाकडे चेंडू सोपवला. हे १६वे षटकाने सामन्याला कलाटणीच दिली.

प्रियंदानाने षटकाच्या पहिल्या तीन चेंडूंवर अनुक्रमे शाह अबरार हुसेन, निर्मलजीत सिंग, चंथोएन रथानक यांना तंबूत धाडत हॅट्ट्रिक घेतली. यानंतर एक चेंडू 'डॉट' टाकला. पुढील दोन चेंडूंवर मोंगडारा सोक व पेल वेन्नाक यांची विकेट घेत त्याने इतिहास रचला. संपूर्ण षटकात कंबोडियाला केवळ एक धाव घेता आली. तीसुद्धा 'वाईड'च्या स्वरूपात मिळाली. १६व्या षटकात पाच विकेट मिळाल्याने इंडोनेशियाने सामनाच जिंकला.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका षटकात पाच बळी घेण्याची ही पहिलीच वेळ असली तरी पुरुष देशांतर्गत टी-२० सामन्यांत यापूर्वी दोनदा अशी कामगिरी पहायला मिळाली आहे. अल-अमीन हुसेन याने २०१३-१४ व्हिक्ट्री डे टी-२० कपमध्ये आणि अभिमन्यू मिथुनने २०१९-२० सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत पाच विकेट्स घेतल्या होत्या.

# दिल्ली कॅपिटल्सचे जेमिमा रॉड्रिग्जकडे नेतृत्व



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीगच्या आगामी चौथ्या हंगामापूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सलग तीन वेळा संघाला फायनलपर्यंत नेणाऱ्या मेग लॅनिंगची जागा आता भारताची स्टार फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज घेणार आहे. २५ वर्षीय जेमिमावर दिल्ली कॅपिटल्सने विश्वास दाखवत तिला आपला नवा कर्णधार म्हणून घोषित केले आहे.

आतापर्यंत पार पडलेल्या तिन्ही हंगामात ऑस्ट्रेलियाच्या मेग लॅनिंगने दिल्ली संघाचे नेतृत्व केले होते, मात्र मेगा लिलावात लॅनिंगला यूपी वॉरियर्सने खरेदी केल्यामुळे दिल्लीला नव्या कर्णधाराचा शोध होता. संघात दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वाड्र्टसारखा अनुभवी पर्याय असतानाही दिल्लीच्या मालकांनी भारतीय खेळाडूला प्राधान्य देत जेमिमाची निवड केली आहे.

जेमिमा सध्या कमालीच्या फॉर्ममध्ये आहे. नुकतीच महिला विश्वचषक स्पर्धेतील तिने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत शानदार शतक ठोकून भारताला विजय मिळवून दिला होता. तिने सध्या सुरू असलेल्या श्रीलंका विरुद्धच्या टी-२० मालिकेत पहिल्याच सामन्यात नाबाद ६९ धावांची खेळी केली आहे. वूमन प्रीमयर लीगमध्ये जेमिमाने आतापर्यंत २७ सामन्यांत १३९.६६ च्या स्ट्राईक रेटने ५०७ धावा आपल्या नावावर केल्या आहेत.

डब्ल्यूपीएल २०२६चा थरार ९ जानेवारीपासून सुरू होत आहे. गेल्या तीन हंगामात उपविजेतेपदावर समाधान मानाव्या लागणाऱ्या दिल्ली कॅपिटल्सला जेमिमा आपल्या कप्तानीखाली पहिले जेतेपद मिळवून देणार का याकडे आता सर्वांचे लक्ष असेल.

# टेक्नॉलॉजीवरून 'ॲशेस'मध्ये वादंग

**सिडनी** : ॲशेस मालिकेवर ऑस्ट्रेलियाने पुन्हा कब्जा केला. पाच सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने ३-० अशी विजयी आघाडी घेतली आहे, मात्र खेळापेक्षाही स्निकोमीटर या तंत्रज्ञानासंदर्भात वादाला तोंड फुटले आहे.

ॲडलेड कसोटीदरम्यान ऑस्ट्रेलियाचा यष्टीक्षक फलंदाज ॲलेक्स कॅरेला पहिल्या डावात बाद देण्यात आले. स्निकोनुसार चेंडू कॅरेच्या बॅटला स्पर्शून जात होता, मात्र रिप्लेने त्याला नाबाद ठरवले. कॅरेने या जीवदानाचा फायदा उठवत ऑस्ट्रेलियाला संकटातून बाहेर काढले. यावरून चर्चा सुरू आहे.

# टी-२०मध्ये दीप्ती शर्माची अव्वल स्थानी झेप

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघासाठी एक आनंदाची आणि एक किंचित निराशेची बातमी समोर आली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत भारताची स्टार अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्माने टी-२० गोलंदाजीमध्ये जगातील नंबर-१ स्थान पटकावले आहे. दुसरीकडे फलंदाजीमध्ये भारताची 'क्वीन' स्मृती मानधनाला आपले अव्वल स्थान गमवावे लागले आहे.

भारताची फिरकीपटू दीप्ती शर्मा आता जगातील सर्वोत्तम टी-२० गोलंदाज बनली आहे.



दीप्तीने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच हे शिखर सर केले आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात विशाखापट्टणम येथे झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात दीप्तीने चमकदार कामगिरी केली. तिने आपल्या चार षटकांच्या कोट्यात केवळ २० धावा देत एक विकेट घेतली.

या कामगिरीच्या जोरावर तिने ऑस्ट्रेलियाच्या ॲनाबेल सदरलँड हिला मागे सारले आहे. सदरलँड ऑगस्ट महिन्यापासून या स्थानावर होती, पण आता दीप्तीकडे तिच्यापेक्षा एक रेटिंग पॉईंटची आघाडी आहे. पाकिस्तानची सादिया इक्बाल आता तिसऱ्या स्थानावर घसरली आहे.

एकीकडे दीप्तीच्या यशाचा जल्लोष सुरू असताना वनडे फलंदाजीच्या क्रमवारीत भारताला धक्का बसला आहे. भारताची धडाकेबाज फलंदाज स्मृती मानधना आता नंबर १वरून दुसऱ्या क्रमांकावर घसरली आहे. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वाड्र्ट आता जगातील नंबर १ एकदिवसीय फलंदाज बनली आहे. आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत लॉराने सलग दोन शतके ठोकली. तिच्या या तुफानी कामगिरीमुळे तिला कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळाले असून तिने मानधनाला मागे टाकले आहे.













**उलवे नोड** : महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि लाखो निसर्गप्रेमींच्या गळ्यातील ताईत असलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथील रामबाग या अतिसुंदर उद्यानाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा हजारो नागरिकांच्या साक्षीने मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात सोमवारी सायंकाळी साजरा झाला. थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि सर्व समाजाचे आधारस्तंभ असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावे व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, म्हसेश्वर मंदिर समिती आणि रामबाग व्यवस्थापन कमिटीच्या वतीने या वेळी त्यांचा हृदय सत्कार करून आदर व्यक्त करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी रामबागच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com